म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. 2909

REFBK-0016619
REFBK-0016619

ग्रं. सं. ठाणें
निबंध
२१०१
१५६

# श्रीज्ञानेश्वर

## तत्त्वदर्शी आणि कवि

स्वामी शिवतत्त्वानंद

श्रीरामकृष्ण आश्रम, नागपूर

२०/३/७९
२९०९

# श्री ज्ञानेश्वर

## ( तत्त्वदर्शी आणि कवि )

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वक्रम
अनुक्रम ७५६३९ दि: निवडक
क्रमांक ५९०९ नों दि. २०/३/७९

स्वामी शिवतत्त्वानंद

REFBK-0016619

श्रीरामकृष्ण आश्रम

नागपूर

प्रकाशक—
स्वामी भास्करेश्वरानंद
अध्यक्ष, श्रीरामकृष्ण आश्रम,
धंतोली, नागपूर-१.

श्रीरामकृष्ण-शिवानंद-स्मृतिग्रंथमाला
पुष्प ७३ वें
(श्रीरामकृष्ण आश्रम, नागपूर द्वारा सर्व अधिकार सुरक्षित)
[ व ६८ : प्र १२·५ ]

किंमत रु. १.१०

मुद्रक—
श्री. डो. पै. देशमुख
बजरंग मुद्रणालय
कर्नलबाग, नागपूर-२

'तत्त्वदर्शी ज्ञानेश्वर' आणि 'कवि ज्ञानेश्वर' हे लेख "जीवन-विकास" मासिकांत प्रसिद्ध झाले होते. ते येथे एकत्र प्रसिद्ध करण्यांत येत आहेत.

३१ जानेवारी १९६८

—प्रकाशक

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. | तत्त्वदर्शी ज्ञानेश्वर .... .... | १ |
| २. | कवि ज्ञानेश्वर ( पूर्वार्ध ) .... | १८ |
| ३. | कवि ज्ञानेश्वर ( उत्तरार्ध ) .... | ३४ |

ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. १६६१८

# तत्त्वदर्शी ज्ञानेश्वर

स्पृह जीवनांतील प्रधान, सर्वांत प्रबल, अगदी मूलभूत प्रेरणा म्हणजे सुखा ! आणि तेंहि—सुखाने जगण्याची ! बाल-वृद्ध-युवा, स्त्री- सुरूप-कुरूप, गरीब-श्रीमंत—प्रत्येकाच्या हृदयांत ही सुखाची च हे स्पंदत, स्फुरत असते. जीवन जितकें जुनें आहे, माणसाचा चि याचा, सुखाने जगण्याचा प्रयत्नहि तितकाच जुना आहे. व्हा ण्यासाठी माणूस काय करणार नाही ? सुखी होण्यासाठी तो आहे कालापासून नाना भलेबुरे उपाय हाताळीत आहे. आणि तसेंच करीत राहणार आहे. कारण—कारण, त्याला सुखी सुख आहे ! ती त्याची सनातन इच्छा आहे. तो त्याचा स्वभाव धड खाने जगल्याखेरीज त्याला राहवतच नाही !

ती ो जें कांही करतो—जें कांही धरतो, जें कांही सोडतो, सारें ी, सुखाच्या आपल्या स्वभावगत प्रेरणेने प्रेरित होऊन. कोण कोण तडफड ! पण काय ? ... मिळणाऱ्या सुखांनी त्याची य सर्वशोषी तहान कांहीकेल्या मिटतच नाही. सदा 'आणखी'

'आणखी'ची खवखव. तृप्ति नाही, समाधान नाही, शांत
तहानलेला. अतृप्ति हा मानवी सुखाला मिळालेला निष्ठुर शाप
आणि तरीदेखील त्याची ती सुखेच्छा अमर—अमरच
पण अजर आहे! तिला मरण तर नाहीच नाही, पण व
नाही! ती त्याच्या अंतरात्म्यांत कुठेतरी अगदी खोल गढलेल
ती सोडणें त्याला शक्य नाही. ती सोडणें म्हणजे जीवनच
जगण्याचेंच थांबविणें. मिळणाऱ्या सुखांनी तृप्त होण्याच
नाही, सुखेच्छा सोडण्याचीहि शक्यता नाही. ह्या दोन 'अ
त्याच्या उभ्या जीवनाचा खेळखंडोबा चालविला असतो.
विटंबनेवर कांहीच का इलाज नाही? हें असेंच चालणार

२

'वस्तुस्थिति' ही अशी आहे खरी. तिचा विचार
निराश, हताश वाटतें, माणसाचा स्वतःच्या शक्तीवरील विश्वास
चूर्ण होऊन जातो. आहे त्यांत शांति नाही, ती कशाने मिळेल
कळत नाही. याप्रमाणे यथामति नाना उपाय योजूनहि शांति-सु
दुरावलेल्या,—विफल, विकल नि अगतिक होऊनहि प्रामा
तळमळीने व्यर्थतेच्या या हाहाकारांतून सुटण्यासाठी धडपडण
कांहीकांही भाग्यवान व्यक्तींना जणु एक निराळेंच श्रवणेंद्रिय ल
आणि तद्द्वारां त्यांना अत्यंत ओळखीची एक अनोळखी वाणी
येऊं लागते—"माम् एव ये प्रपद्यन्ते, मायाम् एतां तरन्ति ते
"जे केवळ मलाच शरण येतात, तेच ह्या हृदयदाही व्यर्थतेचा अ
करूं शकतात!"

ही वाणी नेहमी अशा अशरीरी रूपानेच प्रकटते असें
नाही. ह्या भाग्यवंतांच्या हृदयगाभाऱ्यांत घुमणारी तीच अनादिअ
अशरीरी, अमूर्त वाणी नाना रूपांनी मूर्तिमती होत असते. इति

..क्ष—ती कधी साकारली आहे शरयूतीरीं, कधी यमुनातटीं !
केरलदेशीं काळडीग्रामीं, तर कधी इंद्रायणीपरिसरीं आळंदीधामीं !
होय, आळंदीधामीं ! "अवघाचि संसार, सुखाचा करीन, आनंदें
तिन्ही लोक", "ज्ञानदेवो म्हणे श्रीमंत, हें अनुभवामृत, सेवोनि
मुक्त, हेंचि होतु"—किती शामक, किती आशामयी आशीर्वाणी
..., आपल्या दुर्दम्य सुखेच्छेच्या पूर्तीसाठी नाना उपाय योजूनहि
..ालेले, 'अशक्यां'च्या कोंडींत सापडून भांवावलेले आपण
वनवसंता'ला शरण जाऊं या. या वसंताची झुळूक आपल्या
लागतांच तें सफलसुफल होईल—आपली सुखेच्छा पूर्ण
होईल. "हा भेटलियाची सवें, पुरती उपायाचे धावे !"—
..ांच' मग उपायगंगा, अनुभव-सागरास जाऊन मिळतें ! ज्या
..ति मूल्यांनी जीवनाला मोल येतें, ज्यांच्या अभावीं जीवन निर्माल्य
..न जातें तीं सनातन जीवनमूल्यें, तीं संजीवक तत्त्वें त्यांच्या
..णांजवळ बसून असीम श्रद्धेने आपण श्रवण करूं या, त्यांवर
करूं या, त्यांचें निदिध्यासन करूं या, आणि तीं जीवनांत
..न कृतार्थ होऊं या, धन्य होऊं या. त्यांच्या बोधामृताच्या
..त्वाविषयी संदेहच नको—तें त्यांचें समाधिलब्ध 'अनुभवामृत'
ज्ञानेश्वर तत्त्व-'चिंतक' नाहीत, ते तत्त्व-'दर्शी' आहेत. आमच्या
..ला मिळालेल्या अतृप्तीच्या शापाचा परिहार व्हावा म्हणूनच हा
..हेंचि परि कारुण्याचा मूर्तु' आम्हांला स्वतःच्या प्रस्थानत्रयीचें—
..अनुभवामृत-पासष्टीचें—मंगल वरदान देऊन गेला आहे.
..रुष, गरीब-श्रीमंत, सर्वच त्यांच्या आशीर्वादाला पात्र—
..ल्यकनकाचिया दाना, हा न कडसी थोरुसाना". विरागविमल,
.. चित्ताने आपण सारेजण त्यांच्या पसायदानाचें मर्म आत्मसात्,
..सात् करूं या——

३

सुखाच्या इच्छेने प्रेरित होऊन आपण दुनियेंतील नाना
मागे धांवत असतों. या वेड्या धावाधावीला आरंभ होतो पाळण्या
तिची समाप्ति होते चितेवर. या मधल्या अवधींत, मिळेल त्या
पासून जमेल त्या प्रकारें शक्य तितकें सुख मिळविण्याचा अ
यत्न चालला असतो. देहसुख, इंद्रियतृप्ति, नामयश, धनमान—
त्या सुखासाठी आपण कोणकोणत्या आणि किती वस्तूंमागे
असतों याची कांही इयत्ता नाही. या वस्तूंची अशी 'इय
आली नाही तरी त्यांचा एक 'विभाग' मात्र करतां येईल.
की, ह्या ज्या साऱ्या वस्तूंमागे आपण धांवत असतों त्या
असंख्य नि विभिन्न असल्या तरी समस्त 'भोग्य' होत.
विविध भोग्य विषयांमागे धांवणारे आपण म्हणजे 'भोक्ते'. या
वस्तूंचा दमछाट पाठलाग करीत शक्य तितका भोग पदरीं
घेण्याच्या भोक्त्याच्या अखंड धडपडीचेंच नांव—जीवन !

हेंच जीवन आपल्याला सुखाने जगावयाचें आहे. ह्या जीव
'तत्त्व' ज्यांनी 'पाहिलें' आहे ते तत्त्वदर्शी ज्ञानेश्वर म्हणता
"तुमच्या जीवनाचे म्हणा की ह्या जगताचे म्हणा, भोग्य आणि
असे हे जे मूलभूत घटक आहेत, ते आहेत तसेच, तुमच्या प्रत्य
येत आहेत तसेच खरे आहेत असें तुम्ही धरून चालतां,
त्यांतील ज्यांपासून सुख होतें किंवा होण्याची आशा असते
तुम्ही जळूप्रमाणे चिकटून बसतां नि ज्यांपासून दुःख होतें
होण्याची शक्यता असते त्यांच्या तुम्ही वाऱ्यालाहि उभे राहूं
नाही. भोग्य-भोक्त्यांविषयीचा हा सत्यत्वबोध आणि त्या बोध
उफाळणारी तुमची सुखेच्छा यांचा परिणाम काय होतो ?—
विषयांवांचूनि कांही । आणिक सर्वथा रम्य नाही । ऐसा स्वभा

पाही। इंद्रियांचा ॥ देखैं इंद्रियीं कामु असे। तो लावी सुखदुराशे। जैसा गळीं [illegible] आमिषें। भुलविजे गा ॥ परी तयामाजीं गळु आहे। जो प्राण घेऊनि जाये। तो जैसा ठाऊक नोहे। झाकलेंपणें ॥' परिणाम —दुःख, अतृप्ति ! या अनिवार्य, अपरिहार्य आशाभंगाचें कारण हेंच की तुमच्या नित्य प्रत्ययाला येणारे हे 'भोक्ता-भोग्य' द्वय आहे तसेंच खरें नाही !"

मूले कुठारः !

मग ह्या आमच्या भोग्य-भोक्तामय जगाचें वास्तव स्वरूप आहे तरी काय ? आळंदीचे हे ब्रह्मकुमार सांगतात—

" 'हे विषय तरी कैसे। रोहिणीचे जळ जैसें। कां स्वप्नींचा आभासे। भद्रजाति'—तुमच्या नित्य प्रत्ययाला येणाऱ्या ह्या साऱ्या सुंदर वस्तु, सुखाची लालूच दाखवून तुम्हांला स्वतःच्या नादीं लावून नेऊन अखेर तुमचें जीवित दुःखमय करून टाकणाऱ्या ह्या भोग्य वस्तु, ज्यांव्यतिरिक्त तुम्ही आणखी कांहीच जाणत नाही, आणि म्हणूनच तुम्हांला रम्य, सारात् सार, परात् पर वाटणाऱ्या ह्या समस्त भोग्य वस्तु खरोखर काय आहेत ? मृगजलासमान, स्वप्नांतील वस्तूंसमान संपूर्ण मिथ्या ! आणि, ज्याच्या सत्यतेसंबंधी तुम्हांला कधी चुकूनहि संशय येत नाही, तुमच्या जीवनाचें केंद्र असे तुम्ही स्वतः हा भोक्ता—त्याचें तरी स्वरूप काय आहे ? 'भूतजात सर्व। माया-योगें जीवदशे आलें'—स्वप्नांमधील भोग्य वस्तूंइतकाच हा भोक्ताहि मिथ्या. या 'लटकेया भूतग्रामां'ना खरी सत्ता नाही".

' आमच्या प्रत्ययास येत आहे त्या स्वरूपांत भोग्यहि मिथ्या नि भोक्ताहि मिथ्या ! अमळ शांतपणें विचार केल्यास तत्त्वदर्शी ज्ञानेशांच्या या अनुभवसिद्ध विधानाची सत्यता सहज पटेल. 'सत्य' कशाला म्हणतात आणि, 'असत्य' कशाला म्हणतात हें सांगतांना आचार्य

शंकरांनी म्हटलें आहे—"जें ज्या वस्तूचें स्वरूप म्हणून ठरविलें जातें त्या तिच्या स्वरूपांत जर बदल होत असेल तर ती वस्तु असत् वा मिथ्या होय. जिच्या स्वरूपांत कदापि बदल होत नाही तीच वस्तु 'वस्तुतः' सत्य होय".* आपल्या नित्य अनुभवास येणाऱ्या जगाला ही सत्यमिथ्याची कसोटी लावली तर काय निष्पन्न होईल? इथे न बदलणारी कोणती गोष्ट असेल तर ती म्हणजे बदलच! सतत बदल, अखंड परिवर्तन—स्वतः आपण म्हणा की जगांतील कोणतीहि वस्तु म्हणा, साऱ्यांचा एकच इतिहास—अविराम स्वरूपव्यभिचार. स्वतः-कडे बघावें—हा शिशु होतों, बाल्य आलं आणि गेलं, बघतां बघतां कैशोर नि यौवन ओसरलं, प्रौढत्वाने पाय रोवले, वार्धक्याची चोरटी चाहूल ऐकूं येते, आणि अखेर कायमचा निरोप घ्यावा लागणार आहे. जन्मतांना बघितलेलीं मुलं हळूहळू केवढीं मोठीं होतात! बाल्यांतील दुर्दान्त क्रीडाप्रियता यौवनाच्या धुंद क्रियाशीलतेंत परिणत होते, ती वार्धक्याच्या दाहक चिंतामयतेंत लीन होते, नि अखेर सारेंच कांही संपतें. शरीर-मनाची, ज्याला आपण 'मी' म्हणतों त्याचीं किती विचित्र परिवर्तनें! सान-थोर, ख्यात-अख्यात सर्वांच्या जीवनाची हीच सनातन कथा. इतिहासाची नदी कुण्या गूढ, अज्ञात काल-गुहेंत उगम पावली, नाना विवर्तन-परिवर्तनांमधून आपल्यापर्यंत येऊन पोहोचली—आपल्याला घेऊन अशीच वाहत जाणार आहे—कुण्या अंधाऱ्या, अगाध अज्ञेयाच्या रोखाने, कुणास ठाऊक. किती राज्यें उभारलीं गेलीं नि कोल-मडलीं, किती नगरें वसलीं नि उध्वस्त झालीं. किती सौंदर्यें कुरूप झालीं, किती कुरूपता कायमची निमाली. कितीतरी यश, कितीतरी कीर्ति,

---

* "यद्रूपेण यत् निश्चितं तत् रूपं न व्यभिचरति तत् सत्यम् ।
यद्रूपेण निश्चितं यत् तत् रूपं व्यभिचरत् अनृतम् इति उच्यते ।"
शंकरभाष्य, तैत्तिरीय उपनिषत् २, १, १.

कितीतरी गौरव नामशेष, निःशेष झाला आहे, होत आहे, होणार आहे. जगांतली कोणतीहि वस्तु घ्या—अस्तित्वांत येते, कांही दिवस टिकते, नाहीशी होते. आपल्या 'सत्या'चे कोण धिंडवडे हे! मग ह्यांना सत्य कसें म्हणावयाचें? सत्य असते तर या साऱ्यांची अशी दशा कां व्हावी? आपण ज्याला 'सत्य' समजून धरून बसलों आहोंत, आपल्या आशा-आकांक्षांचें एकमेव आस्पद, आजन्म आमरण ज्याच्या खरेपणाविषयी आपल्याला कधी शंका शिवत नाही, आपल्या सुखाचें एकमात्र निधान, आपलें सर्वस्व असें हें भोग्यभोक्तामय जगत् याप्रमाणे 'स्वभावतः'च बदलणारें आहे--परिवर्तन हा त्याचा 'पिंडगत' धर्म आहे.

'जी गोष्ट अशी 'स्वरूपतः'च बदलती आहे ती कदापि खरी असूं शकत नाही. जी वस्तु अस्तित्वांत येण्यापूर्वी नसते, अस्तित्वांत आल्यापासून सारखी बदलत जाते, नि बदलतां बदलतां अखेर नाहीशी होते ती वस्तु साद्यन्त अभावाने ग्रस्त असते. बदल म्हणजेच अभाव, अभाव म्हणजेच शून्यता. बदलत्या प्रत्येक वस्तूंत ही शून्यता ओत-प्रोत असते—तो तिचा गुणधर्म होय. मेघांतील वाघसिंहाइतकी, मृगजलाइतकी, रज्जुसर्पाइतकीच ती खरी, म्हणजेच पूर्णतया खोटी—असत्, अनृत, मिथ्या. ती खरी वाटणें हा आपला अविवेक होय, भ्रांति होय. ज्ञानेश्वर म्हणतात,—" 'जे उपजे आणि नाशे। ते मायावशें दिसे।' 'देखै विवेकी जे होती। ते दोहींतेंही न शोचिती। जे होये जाये हे भ्रांती। म्हणौनिया॥' 'येर मध्ये जें प्रतिभासें। तें निद्रिता स्वप्न जैसें। तैसा आकारु हा मायावशें।' 'तैसें सकळ हे मूर्त। जाण पां मायाकारित। जैसें आकाशी बिंबत। अभ्रपटल॥' हा भास-आभासांचा फोल पसारा संपूर्ण मिथ्या असूनहि तुम्ही त्याला सत्य समजून कवटाळीत आहां".

खरोखर किती वेडेपणा हा आपला. आणि, ह्या असल्या खोट्या, फसव्या भोग्य वस्तूंपासून सुख मिळविण्याच्या आशेने, मृगजळामागे पळणाऱ्या तृषार्त हरिणांसारखे आपण आयुष्यभर इतस्ततः धावपळ करीत असतों. उत्पत्ति-विनाश, आणि म्हणूनच मिथ्यात्व हा या भोग्य-भोक्त्यांचा 'धर्म', आणि आपल्याला सुखाच्या हुलकावण्या देत सतत दुःखी करणें हेंच त्यांचें ' कर्म '. कशी बरें तज्जन्य भोगांनी आमची तृप्ति व्हावी ? मृगजळ पिऊन तहान का मिटणार आहे ? आणि मग या फसवणुकींतून अखेर वैफल्याखेरीज, दुःखाखेरीज, अतृप्तीखेरीज आणखी काय बरें निष्पन्न व्हावें ?

●

अगदी खरें. पण हें सारें जाणून नि उमजूनहि जीवनाचा यक्षप्रश्न सुटतो काय ? उलट, हें सारें पटल्यावर तर प्राण अधिकच व्याकुळ होतात. ह्या साऱ्याचा अर्थ हाच ना की आमचें हें जन्मापासून ओळखीचें, गोड जग 'गंधर्व दुर्गा'सारखें, 'शशविषाणा'सारखें, 'खपुष्पा'सारखें मिथ्या आहे, शून्य आहे ? तें 'वांझेचीं घरभरी लेकुरें जैशीं' तसें मुळी अस्तित्वांतच नाही, असेंच ना ? आणि आमचें हें 'मी'पणदेखील 'लटकें' 'सर्पपण मालेचें' असेंच ना ? हें सारेंच जर शून्य, आणि म्हणून सोडून द्यावयाचें तर मग आमच्या जीवनांत उरलें काय ? आम्हांला 'जीवन' म्हणून माहीत असलेलें सारें आमच्यापासून हिरावून घेऊन का तुम्ही आमच्या जीवनाचा प्रश्न सोडविणार आहांत ? भोग्य आणि भोक्ता दोन्ही वस्तुतः मिथ्या आहेत, आणि म्हणूनच कितीहि धडपडलों तरी आमचें जीवन अतृप्त, दुःखी होतें आणि होणारच म्हणून जर ह्या भोक्ता-भोग्यांना तिलांजलि द्यावयाची तर मग शिल्लक काय उरलें ?

आमच्या प्राणांच्या असल्या कासाविसीने हेलावून गेलेले

ज्ञानेश्वर स्नेहस्निग्ध उत्तर देतात—"जीवनांतून भोग्य-भोक्तृत्वाचीं हीं शून्यें वजा केल्यानंतर बाकी राहतो तो—'सर्व शून्याचा साहे निकर्ष जो !' बाकी राहतो—'सर्व शून्याचा निष्कर्षु' असा तो पूर्ण ! – तो आनंदघन, सत्यस्वरूप चैतन्यनाथ ! – ह्या साऱ्या बदलत्या शून्यांचें न बदलतें अधिष्ठान ! 'नमः पूर्णाय शंभवे !!'

"सांजेच्या अंधुक प्रकाशांत भासणारा रज्जु-सर्प, त्या समयीं प्रत्ययास येतो त्या स्वरूपांत संपूर्ण मिथ्या, अजीबात शून्य खरा. पण पूर्ण प्रकाश येतांच त्या भ्रांतीचा निरास झाल्यानंतर तिथे शून्य का उरतें ? नाही ! तिथे उरते रज्जु ! त्याचप्रमाणे भोग्य-भोक्त्याची, 'मी-माझे'पणाची ही भ्रांति लयास गेल्याने जीवनांत शून्य उरत नाही, तर—पूर्ण !—त्या भोग-भोक्त्यांचें खरें स्वरूप प्रकट होतें, इतकेंच. 'तेचि संकल्पाची सांज जै लोपे। तैं अखंडितचि आहे स्वरूपें। जैसें शंका जातखेंवो लोपे। सापपण माळेचें ॥' 'तयाचि परी किरीटी। ह्या प्रकृति जालिये सृष्टी। जैं उपसंहरूनि कीजेल ठी। तैं मीचि आहे ॥' भोग्य-भोक्ता-भोग हीं 'तिन्हीं गेलिया एकचि व्यक्ति। तरी तिन्ही भ्रांति। एकपण साच ॥'

"सर्प, रजत वा मृगजळ अस्तित्वांत असतें तरच ना तें सोडण्याचा, आहे तेंहि गमवून बसण्याचा, नि म्हणून सोडतांना प्राण व्याकुळ होण्याचा प्रश्न ? पण वस्तुस्थिति खरोखर काय आहे ? सर्प, रजत वा मृगजळ तिथे मुळी नाहीच—तुम्हांला दिसण्यापूर्वी नव्हतें, तुम्हांला दिसत असतांना नाही, आणि तुमचा भ्रम गेल्यानंतरहि नसणार. मग तिथे आहे काय ?—रज्जु, निव्वळ शुक्तिका, केवळ मरुभूमि ! 'रज्जु जालिया गोचरु। आभासतां तो व्याळाकारु। रज्जुचि ऐसा निर्धारु। होय जेवी ॥' सर्प, रजत वा मृगजळ तिथे कधी नव्हतेंच—कधी झालेंच नाही. तिथे सदा विद्यमान आहे—अधिष्ठानच,

तद्वतच, ज्यांना जीवनसर्वस्व मानून तुम्ही क्षणभरहि सोडूं इच्छीत नाही ते भोक्ता-भोग्य मुळी अस्तित्वांतच नाहीत, कधी झालेच नाहीत —न कधी होते, न कधी असणार. सदा विद्यमान आहे तो जीवनाधार, तो अखिलाधार– चिन्मय आनंदकंद प्रभु—'जयासी दुजें नाही !' मग जें खोटें आहे, वस्तुतः नाहीच, तें सोडल्याने जीवन शून्य होण्याची भीति निराधार, वृथाच नव्हे काय ? तें 'सोडण्याचा' वा सोडतांना प्राण व्याकुळ होण्याचा प्रश्नच कुठे येतो ? जें नाहीच, तें सोडणार काय, नि त्यासाठी कातरता तरी कसली ?' 'सुताचिये गुंजे। आंतबाहेर नाही दुजें।'—सुताच्या गुंडींत आंतबाहेर सर्वत्र जसें सूतच सूत, तसाच तुमच्या आंतबाहेर सर्वत्र सदा विद्यमान आहे तो चिन्मय सत्ता. म्हणून 'आदीचि जें नाही। तेयालागी तूं रुदसी काई। तूं अवीट तें पाहीं। चैतन्य एक ॥' बदलती शून्यता झिडकारून मोबदल्यांत चिरंतन पूर्णता स्वीकारतांना मोह नि दुःख ? सोडावयाचें तर कांहीच नाही, फक्त स्वतःचें नि जगाचें खरें स्वरूप धरावयाचें, आणखी कांहीच नाही. जीवनांतील मायिक, विनाशी आभास सोडून जीवनाचें तत्त्व घ्यावयाचें—'जे उपजे आणि नाशे। ते मायावशें दिसे। येऱ्हवीं तत्त्वता वस्तु जें असे। ते अविनाशचि ॥' जें वस्तुतः, तत्त्वतः जसें आहे तें तसें बघावयाचें. याने जीवन शून्य कसें होईल ?

" 'दृश्य कां द्रष्टा। दोन्ही दशा वांझटा'—या भोग्य-भोक्त्या-विषयी बोलणें म्हणजे 'वांझेचि संतति वानणें जैसे'. भ्रांतीने रज्जूचें ठिकाणीं प्रत्ययास येत असलेला सर्प खरा तर नाहीच नाही, पण खोटाहि नाही. कारण 'खोटा' असावयासहि सर्प 'असावा' लागतो. पण सर्प मुळी नाहीच. आहे—एकमात्र रज्जु—'हा वांचूनि नसे येथ कांही'. म्हणून तुम्ही या खोट्याचा मोह सोडून निर्भयपणें, निःशंकपणें त्या 'महाशून्याच्या डोहीं' उडी घ्या. ह्या अनित्य, असत् शून्यांमागे

धांवून सुख-शांति कधीतरी मिळणें शक्य आहे काय ? 'देखै अनित्य तियापरी । म्हणौनि तूं अव्हेरी । हा सर्वथा संगु न धरी ।' हीं शून्यें सोडून दिल्याने, आणि तीं सोडून द्याल तरच तुम्हांला त्या पूर्णाचा लाभ होऊं शकेल—होईल.

"या चिरपरिचित भोग्य-भोक्तृत्वाचा, 'मी-माझें'चा त्याग केल्यास जीवन शून्य होईल अशी तुम्हांला भीति वाटते. पण वस्तुस्थिति अगदी उलट आहे. वस्तुतः अस्तित्वांतच नाहीत अशा ह्या मिथ्या भोग्य-भोक्तृत्वाला कवटाळून बसल्यानेच उलट तुमचें जीवन विफल झाल्याखेरीज कदापि राहणार नाही. ह्या निव्वळ अविवेकजन्य, निराधार भयाने तुम्ही जर 'मी-माझें'चा लोभ सोडणार नाही तर 'मूर्खपणें नेणसी । न चिंतावें तें चिंतिसी' अशी अवस्था होऊन 'प्रतिपदीं आत्मघातु । भुंजतां उसंतु । कहीचि नाही ॥ येवढेनि दारुणें । निमणेवीण निमणें । पडेल जरी बोलणें । नेघसी माझें'—जीवनांतील अकल्पित, अभाव्नीय, अतर्क्य नि अनिवार्य दुःखाच्या भडिमाराने भांबावून जाल, न मरतांच मरणप्राय दुःख सोसावें लागेल. सत्य सोडून जो असत्याच्या पाठीमागे लागतो त्याला वैफल्याखेरीज आणखी काय लाभणार ?—'का कोंडा कांडतां कांडतां । कणु लाभे ?' तो आपल्या हातानेच आपल्या जीवनाची विटंबना करीत असतो—'हृदयामध्ये मी रामु । असतां सर्वसुखाचा आरामु । कीं भ्रांतासी कामु । विषयावरी ॥ बहु मृगजळ देखोनि डोळां । थुंकिजे अमृताचा गिळतां गळाळा ॥ तैसी अहंममतेचिये लवडसवडी । मातें न पवतीचि बापुडीं । म्हणौनि जन्ममरणाची दुथडी । डहुळितें ठेलीं ॥' मिथ्या भोग्य-भोक्तृत्वाला कवटाळण्याचा, 'मी-माझें'पणाच्या लोभाचा कोण घोर परिणाम".

पूज्यपादांच्या चरणीं प्रणाम असो. परंतु, आंत बाहेर सर्वच जर केवळ तो चिन्मयच विद्यमान, त्याच्याखेरीज दुसरें आणखी जर कुठेच कांही नाही, तर मग हें आमच्या नित्य प्रत्ययास काय येत आहे ? हें नित्य प्रत्ययास येणारें, भोग्य-भोक्तामय, चिरपरिचित जगत् मिथ्या आहे, शून्य आहे—मुळी अस्तित्वांतच नाही, झालेंच नाही, तर मग आमच्या सतत अनुभवाला येत आहे तें काय ? दिवसरात्रीचा भेद करून आमचें दैनंदिन जीवन शक्य नि नियमित करणारे हे सृष्टिदेवीच्या हातांतील सूर्य-चंद्राचे ज्योतिर्मय प्रदीप मग काय आहेत ? आपल्या विस्ताराने अनादिकालापासून मानवी मनाला मोहविणारा हा ग्रहताऱ्यांचा लुकलुकता पसारा मग काय आहे ? आपल्या आगमनाने मानवी हृदयांत अननुभूत, गूढ भाव जागविणारे हे शरत्-वसंताचे फेरे मग काय आहेत ? आबालवृद्धवनिता सर्वांना भुरळ पाडून छेडणारा हा स्त्री-पुरुष भेद मग काय आहे ? सृष्टीभर प्रत्ययास येणारीं, नाना सुखदुःखांस कारणीभूत होणारीं हीं विविध, विचित्र रूपें, हे गंध, हे स्पर्श, हे रस—हें सारें मग काय आहे ? आणि, ज्याच्याखेरीज ह्या कशाचाच अनुभव शक्य नाही, ज्याला आम्ही क्षणभरहि विसंबूं शकत नाही, तो 'मी' तरी मग काय आहे ?

"जीवनसिद्ध ज्ञानेश्वर 'सिद्धानुवाद' करीत उत्तर देतात—"हा सारा त्या चिन्मयाचाच लीलाविलास— चिद्विलास ! तो एकमेवाद्वितीय चैतन्यनाथच ह्या अनंतविध भोग्य-भोक्त्यांच्या रूपांनी नटलेला आहे —तोच भोक्ता, तोच भोग्य. मी-आम्ही, तूं-तुम्ही, तो ती तें-ते त्या तीं—सर्व रूपांनी तोच विलसत आहे. चंद्रसूर्यतारा, आपली ही वसुंधरा, अस्तित्वांत असलेला हा विश्वमय पसारा, सर्वकांही तोच—तोच ह्या साऱ्या रूपांनी विराजत आहे. तोच स्त्री, तोच पुरुष. यौवन-मदमत्त कुमारकुमारी, जराजर्जर वृद्ध नरनारी, सर्व तोच. 'जग असिकी

वस्तुप्रभा',—रत्न आणि त्याची प्रभा! 'जसें प्रभा आणि भानु। एकचि ते'. शब्दस्पर्शरूपरसगंधमय हें आंतरबाह्य समस्त जगत् त्या चिद्रत्नाची, त्या चित्सूर्याची प्रभाच होय. 'विभाति यस्य भासा। सर्वमिदं हा ऐसा। श्रुति काय वायसा। ढेकरू देती?'—तोच या सर्व रूपांनी प्रतिभात होत आहे. 'शिवोनी पृथ्वीवरी। भासती पदार्थाचिया परी। प्रकाशे ते एकसरी। संवित्ति हे॥' 'प्रकाशे ते संवित्ति। जगदाकारें'. आहे केवळ तो चिन्मयच, तोच भोग्य-भोक्त्यांच्या, 'मी-माझें'च्या रूपांनी खेळत आहे. रज्जुच सर्प आहे, तुम्ही ज्याला सर्प म्हणतां, ती वस्तुतः रज्जुच आहे—रज्जुच त्या सर्परूपाने विराजमान आहे. 'नाना कल्लोळपरंपरा। संतति जैसी सागरा। आम्हा आणि चराचरा। तैसा पाडु॥' 'बाल्यादि तिन्हीं वयसीं। काया एकचि जैसी। तैसें आदि-स्थिति-ग्रासीं अखंड जें॥' जो चिन्मय तोच जगन्मय. 'अभय मी आधारु। आधेय मी।' 'सर्व मी सर्वगतु। सर्वातीतु मी'. जो सर्वातीत तोच सर्वगत—खाली वर, मागे पुढे, आजूला बाजूला सर्वत्र तोच सर्वमय. नेति नेति, इति इति—उभयथा तो सच्चिदानंदच." '

४

'म्हणून जगाच्या ह्या चिद्विलासमय अनुभवाव्यतिरिक्त जगविषयक इतर कोणताहि अनुभव संपूर्ण खोटा, भ्रमात्मक, नितान्त असत्य होय. आणि म्हणूनच, ज्याला त्या 'रज्जू' चा अनुभव हवा आहे, त्याने ह्या 'सर्पा'चा अनुभव पूर्णपणें झिडकारावयास हवा. ज्याला शुक्तिका हवी आहे त्याने मिथ्या रजताचा मोह पूर्णपणें सोडून द्यावयास हवा. अंधार आणि उजेड यांच्याइतके परस्पर भिन्न असे हे जगविषयक दोन अनुभव एकाच व्यक्तीच्या बोधांत वसणें कदापि शक्य नाही. भोग संपूर्णपणें सोडल्याखेरीज संपूर्णपणें योग साधणें

कदापि शक्य नाही. आणि म्हणूनच, विवेकाने जगविषयक ह्या खोटया, भ्रमात्मक अनुभवाचा त्याग न करतां, ह्या असत्याविषयीची, ह्या शून्यांविषयीची आसक्ति सोडून न देतां, 'मी-माझें'चा लोभ न सोडतां, ह्या येत्या-जात्या-बदलत्या भोग्य-भोक्त्याच्या मिथ्यात्वाचा प्राणोप्राण बोध करून न घेतां, सारांश, ह्या संमोहक मृगजलाचें आकर्षण हृदयांतून समूळ दूर न करतांच हें जग ज्या स्वरूपांत प्रत्ययास येत आहे त्याच स्वरूपांत तें चिद्विलास आहे असें मानून, या ना त्या प्रकारें, स्थूल वा सूक्ष्म भावें भोग्य-भोक्त्याची स्वतंत्र सत्ता राखून जे चिद्विलासाचा आनंद उपभोगूं पाहतात, त्या सच्चिदानंद-स्वरूप लीलामयाचा लाभ करून घेऊं पाहतात, त्यांची दशा म्हणजे 'मी म्हणौनि प्रपंचीं। जिहीं बुडी दिघली कृतनिश्चयाची। तिहीं चंद्रासाठी जळींची। प्रतिमा धरिली !' काया म्हणून छाया आलिंगण्याचा प्रकार हा ! हें भोग्य-भोक्तामय संपूर्ण जगत्, हें मी-माझें आज प्रत्ययास येत आहे त्या स्वरूपांत पूर्णतया मिथ्या, शून्य आहे, तें खरोखर नाहीच, वस्तुतः तो एकमेवाद्वितीय चैतन्यनाथच ह्या साऱ्या रूपांनी, ह्या साऱ्या आकारांनी लेलायित आहे, तोच हें सारेंकांही आहे, असा ज्यांना ह्या जगाचा अनुभव येतो त्यांनाच जगाचा खरा अनुभव येतो, तेंच ह्या जगाचें खरें दर्शन, सम्यक् दर्शन होय, तोच यथार्थ चिद्विलासाचा अनुभव होय. 'आकार जेथ सरे। जीवत्व जेथ विरे। द्वैत जेथ नुरे। अद्वय तें.'[१] एरवी, मिथ्या 'मी-माझें'ला कवटाळून, जग आज प्रत्ययास येत आहे त्याच स्वरूपांत तें चिद्विलास आहे असें मानून जगाचा उपभोग घेत जे स्वतःला चिद्विलासाचा अनुभव येत आहे असें समजतात, ते घोर आत्मवंचना करून घेत असतात, स्वतःची फसवणूक करीत असतात आणि लोकांनाहि ठकवूं जात असतात. अशा जीवनांत पूर्णत्व येणें कदापि शक्य नाही. शून्यावरील आसक्ति

संपूर्णपणें सोडून दिल्याखेरीज तो पूर्ण कसा लाभणार? 'स्थूलाकारीं नाशवंतें। भरवंसा बांधोनि चित्तें। पाहती मज अविनाशातें। तरी कैंचा दिसे?' अंधाराचें आकर्षण झिडकारल्याखेरीज प्रकाश कसा दिसणार? पूर्वेची ओढ झिडकारल्याखेरीज पश्चिम कशी गाठणार?—'अगा काई पश्चिमसमुद्राचिया तटा। निघिजत आहे पूर्वेलिया वाटा?'

५

असो तर, ज्ञानेश्वर आपल्याला 'जग' सोडावयाला सांगत नाहीत, तर सोडायला सांगत आहेत जगाविषयीची आपली चुकीची, खोटी 'धारणा'. कारण, जगाविषयीची आपली आजची धारणा जगाच्या आपल्या अपुऱ्या, एकांगी, संकुचित, तोटक्या नि भ्रान्तिमय अनुभवावर उभारलेली आहे. जगत्सत्यतेचें हें दाहक अनुभव-विष आपल्या जीवनांत भिनलें आहे, आणि त्यानेच आपलें उभें जीवन विषारी, दुखरें, बेचव करून टाकलें आहे. जोंवर हें जगत्सत्यतेचें 'अनुभव-विष' चिद्विलासाच्या 'अनुभव-अमृता'ने मारलें जाणार नाही तोंवर आपल्या जीवनाचा असाच दाह होत राहणार, सुखशांतीची आशा तोंवर दुराशाच ठरणार.

म्हणून, सुखाची स्वभावसिद्ध इच्छा सोडणेंहि अशक्य, आणि ती इच्छा तृप्त होणेंहि अशक्य, अशा या दोन अपरिहार्य अशक्यांची जीवनांतील चमत्कारिक कोंडी फोडण्याचा हा एकच उपाय होय, असा तत्त्वदर्शी ज्ञानेशांचा 'आम्हां भांबावलेल्या जनांना अनुभवसिद्ध आदेश आहे.' ज्ञानेश्वर म्हणतात—" 'किंबहुना भवा बिहाया। आणि साचे चाड आथि जरी मियां। तरी तूं गा उपपत्ति इया। जतन कीजे' —जीवनाचें हें भयावह कोडें जर तुम्हांला सोडवावयाचें असेल, सत्याची जर चाड असेल तर 'हृदयीं स्वयंभचि' आणि म्हणूनच 'सुलभ आणि सोपारें' 'सर्व गुह्यांचा गोसावी' अशा या ऊर्जस्वल

जीवन-दर्शनाची कांस धरा, तें आत्मसात् करा, जीवनांत आणा. एरवी तुमच्या हृदयांतील ही दुःखहीन सुखाची अदम्य इच्छा हें मृगजळ कितीहि पीत राहिलांत तरी तृप्त होणें कदापि संभवनीय नाही. नशिवीं येईल केवळ फसवणूक—दुःखच दुःख. परंतु हा मृगजळसदृश 'विश्वाभासु'—हा भोग्य-भोक्तृत्वाचा, 'मी-माझें'चा चिरपरिचित आभास मावळून आंत-बाहेर तो चिन्मय अनुभवास येऊं लागताच, त्या 'अनुभव-अमृता'ने ही तुमची सुखाची तृष्णा कायमची शमेल—पूर्णतया तृप्त होईल. ह्या चिद्विलासाच्या अनुभवाने तुम्ही 'सुखी' होणार नाही, तर 'सुख'च व्हाल !—सुखस्वरूप, आनंदस्वरूप होऊन जाल. कारण 'सत्ता प्रकाश सुख' हें तुमचें मुळी स्व-रूपच आहे—'एवं सत्-चित्-आनंदु । आत्मा हा ऐसा शब्दु । अन्यव्यावृत्ति-सिद्धु । वाचक नव्हे ॥' म्हणून तर तुम्हांला नेहमी 'असावें' आणि तेंहि 'सुखा'ने असावें असें वाटतें ! जगण्याची, आणि तेंहि सुखाने जगण्याची ही तुमची अमर, अजर इच्छा अगदी नैसर्गिक, स्वभावसिद्ध आहे. तो तुमचा सनातन, चिरंतन स्व-भाव आहे. परंतु स्व-रूपाचा, सत्याचा विसर पडल्यामुळे तुम्ही, प्रत्ययास येणाऱ्या भोग्य-भोक्तृत्वाच्या आभासांना सत्य मानीत आहां नि वेड्यासारखे ह्याच क्षणस्थायी जीवनाला नि त्यांतील क्षणभंगुर सुखांना बिलगत आहां आणि परिणामीं इतकें दुःख भोगत आहां, अतृप्तीच्या आगींत पोळत आहां. चिद्विलासाच्या बोधाने, या सम्यक् दर्शनाने ही 'अविद्येची जवनीक' फिटून हा भोग्य-भोक्तृत्वाचा निस्सार पसारा कायमचा तिरोहित होऊन आंत-बाहेर सर्वत्र 'अनुभवा'स येऊं लागेल तो एकमेवाद्वितीय लीलामय—'मग अज्ञान निमालिया । मीचि एकु असे अपैसया ॥'. 'जीवन-तत्त्वा'च्या या दर्शनाने तुमच्यांतील 'मी-माझें' लोपून त्या ठिकाणीं 'तूं-तुझें' आविर्भूत होतांच—'जळीं पडिलिया लवणा ।

सर्वेही जळ होय विचक्षणा। तुज मी अनन्यशरणा। होईन तसा' —तुम्ही त्या आनंदसागराशीं एक होऊन जाल, आनंदस्वरूप होऊन जाल. आणि समुद्राला का कधी पाण्याची तहान लागत असते? तद्वतच मग तुम्हांलाहि कधी सुखाची तहान लागणार नाही. कारण मग तुमच्या निरंतर प्रत्ययास येत राहील की तो चिन्मय आनंदसिंधुच तुमच्या नि विश्वान्तर्गत अखिल वस्तूंच्या रूपांनी कल्लोळत आहे. याप्रमाणे 'आत्माएवढिया सुखा'चे धनी होऊन, 'स्वानंदसाम्राज्याचे चक्रवर्ती' सम्राट होऊन सुखाने जगण्याची तुमची कितीतरी जन्मांची इच्छा एकदाची (नि कायमची) पूर्ण होईल''.

---

# कवि ज्ञानेश्वर

## ( पूर्वार्ध )

इंग्रजी भाषेंत एक म्हण आहे. तिचा अर्थ असा की ईश्वरा, माझें माझ्या मित्रांपासून रक्षण कर ! ज्याने ही म्हण बनविली त्याला स्वतःच्या मित्रांचा मोठा विचित्र अनुभव आला असला पाहिजे. आपल्यापैकीहि पुष्कळांना पुष्कळदा असा अनुभव येत असतो. माणूस जितका मोठा तितका त्याला असला अनुभव अधिक येतो; कारण त्याचें मोठेंपण त्याच्या 'मित्रां'ना नेहमी आकलतां येईलच हें संभवत नाही. हें झालें केवळ लौकिक 'मोठ्या' माणसांविषयी. मग, स्वतः-विषयीची नि जगाविषयीची ज्यांची 'जाणीव' आणि तद्विषयक तुम्हां-आम्हां झाडून सर्व लहान-मोठ्या माणसांची जाणीव या दोहोंत अगदी अक्षरशः अस्मान आणि जमीन यांच्याइतकें अंतर असतें, त्या 'सम्यक्‌दर्शन'संपन्न अ-मानवी महापुरुषांविषयी तर बोलावयासच नको. जगाविषयीची सान-थोर सर्व मानवांची जाणीव ( empirical consciousness ) व या अपौरुषेय महापुरुषांची जाणीव ( transcendental consciousness ) या दोहोंतील 'प्रकारगत' पार्थक्य वर्णू

जाऊन भगवती गीता म्हणते की, इतरांना जी रात्र तो यांना दिवस, आणि इतरांना जो दिवस ती यांना रात्र असते. 'रोहिणीचें जळ' (मृगजळ) जळच समजून इतरेजन सतृष्ण धापा टाकीत सतत त्यामागे धावत असतात, तर तें 'स्वप्नींच्या भद्रजाती'( हत्ती )समान आभासमय, मिथ्या आहे, तो 'वस्तुतः' त्या मरुभूमीचाच लीलाविलास आहे हें जाणून हे स्थितप्रज्ञ महापुरुष आत्मरत, आत्मतृप्तच राहून त्याचा आस्वाद घेत असतात, आणि इतरांनाहि तो आस्वाद मिळावा म्हणून आपल्या अहेतुक दयामय स्वभावानुसार कायावाचामनें अजस्र यत्न करीत असतात. अशांचें लोकातीत व्यक्तित्व, त्यांचीं स्वार्थगंध-शून्य कर्में नि अपरोक्षानुभूतिव्यंजक वाणी हीं त्यांच्या 'मित्रां'ना कळूं शकतील तरच खरोखर आश्चर्य ! मांडुक्यकारिकेंतील अलातशांति प्रकरणाच्या अखेरीस पूज्यपाद गौडपादाचार्य म्हणतात—

"अजे साम्ये तु ये केचित् भविष्यन्ति सुनिश्चिताः ।
ते हि लोके महाज्ञानाः, तत् च लोको न गाहते ॥"

—'मी आणि जगत्' यांविषयी ज्यांना सम्यक् 'दर्शन' लाभलें आहे तेच खरे ज्ञानी. सामान्यबुद्धीच्या इतरांचा त्यांच्या त्या 'जाणिवें'त प्रवेश होणें असंभव, इतरांना तिची कल्पनाहि करतां येणें अशक्य. फार काय पण या महापुरुषांच्या नि आपल्या बोधांत असलें कांही प्रकारगत, विलक्षण पार्थक्य असतें ह्याचीदेखील या त्यांच्या मित्रांना कल्पना नसते. आणि ती नसते म्हणूनच या अशा महापुरुषांचा व त्यांच्या वाणीचा त्यांच्या 'मित्रां'नी चालविलेला खेळखंडोबा बघून पुष्कळदा प्रार्थना करावीशी वाटते की, ईश्वरा, यांचें ह्या मित्रांपासून रक्षण कर, कारण तूंच करणार नाहीस तर तें इतर कुणालाहि जमणार नाही !

●

श्री ज्ञानेश्वरहि अशाच सम्यक्दर्शी महापुरुषांपैकी एक होते,

गौडपादांच्या उपर्युक्त आदर्शानुसार महाज्ञानी होते. ज्ञानेश्वर एक निष्णात जीवनशिल्पी होते. आपल्या व्यक्तित्वाने, आपल्या जीवनाने आणि विशेषतः आपल्या ग्रंथांनी ते असलीं चिरंतन जीवनमूल्यें तुमच्याआमच्यासाठी ठेवून गेले आहेत की, डोळस बुद्धीने नि सश्रद्ध हृदयाने त्यांच्या चरणचिन्हांचें अनुसरण केल्यास, युगोपयोगी दृष्टि ठेवून त्यांच्या ग्रंथांचें अनुशीलन केल्यास आपली जीवनयात्रा सुगम होईल, सुकर होईल,—या जीवनसमुद्रावरील गर्जनमुखर लाटांनी गिळंकृत न होतां आपण अधर हिंदोळत हळूहळू पण निश्चित त्या अभिवांच्छित शांतिमय पर-पारीं जाऊन पोहोचूं शकूं. ईशदूत येशू ख्रिस्तांनी म्हटलेंच आहे की, "जो अशांचें अनुसरण करतो त्याला अंधारांत चाचपडावें लागत नाही, कारण जीवनाच्या आलोकाने (प्रकाशाने) त्याचा मार्ग उजळलेला असतो".

पण हें सर्व शक्य आहे केव्हा ? त्यांच्या व्यक्तित्वाच्या प्रकाशांत त्यांच्या ग्रंथांचें नि त्यांच्या ग्रंथांच्या प्रकाशांत त्यांच्या व्यक्तित्वाचें रहस्य यथार्थपणें आकळून, तदनुसार आपलें स्वतःचें जीवन सत्यनिष्ठ, ज्ञानप्रतिष्ठ नि आनंदमय करण्याच्या प्रामाणिक स्पृहेने आपण तत्प्रदत्त जीवनमूल्यें स्वतःच्या जीवनांत प्रत्यक्ष कार्यांत उतरवूं तेव्हाच ना ? पण धन्य आपल्या शबल बुद्धीची, धन्य आपल्या दुर्बल मनाची. स्वतःचें जीवन त्यांच्या उपदेशानुसार वर उचलावयाचें सोडून उलट त्यांचे उपदेशच आपण, त्यांचे मित्र, स्वतःच्या पातळीस ओढून आणतों ! त्यांच्या मानदंडाने स्वतःला जोखावयाचें सोडून स्वतःच्याच मानदंडाने त्यांना जोखून आपण त्यांच्या व्यक्तित्वाचा, त्यांच्या जीवनाचा नि त्यांच्या वाणीचा घोर विपर्यास करून टाकतों, आणि स्वतःच्या अशा मूढपणाने एका प्रकाशमय, अमोघ मार्गदर्शनास मुकतों.

बघा ना—त्यांची ज्ञानेश्वरी वाचून कुठे ऊर्जस्वल यथार्थ जीवन-

दा. क्र. १६६१८

मूल्यांचें दर्शन घडून जीवन-रसायनाचा लाभ व्हावयाचा तिथें आपल्याला लाभतो—काव्यरस ! समग्र ज्ञानेश्वरी वाचूनहि शेवटीं एवढ्या थोर आध्यात्मिक मार्गदर्शकाला 'कवि' 'साहित्यिक' ठरवून आपण फिरून अंधारांत चाचपडत पूर्वीचेंच जीवन जगण्यासाठी मोकळे होतों. ह्या 'ब्रह्मसाम्राज्यदीपिके'च्या उजेडाने स्वतःच्या जीवनाचा अंधार उजळून घेण्याचें आपण स्वतःच नाकारतों. आणि हें सर्व परत ज्ञानेश्वरीच्या खोल संशोधनाचा पसारा मांडून, तिच्या सखोल अध्ययनाचा देखावा करून. ज्ञानेश्वरीच्या निष्ठायुक्त अनुशीलनाने, तिच्या श्रवण-मनन-निदिध्यासनाने 'विकृतीविण संसारदुःखा मोकलवणें' (अनायास संसारदुःख नाहीसें होणें, 'प्रपंचोपशम' होणें) आणि ऐलथडीसच 'मोक्षु' पावणें इत्यादि सारें म्हणें निव्वळ अर्थवाद वा अतिरंजित फलश्रुति—सोप्या शब्दांत म्हणजे भाकडकथा ! आणि मग 'श्रोत्यांच्या अपेक्षेने पाहतां ज्ञानेश्वरीच्या रचनेचा आद्य हेतु' काय ? तर 'सद्यःपरनिर्वृति'—कोणतेंहि काव्य 'वाचतां वाचतां' जो आनंद होत असतो तो ! म्हणजे मथितार्थ असा की, करमलें नाही की ज्ञानेश्वरी, अमृतानुभव प्रभृति 'काव्यें' वाचून त्यांतील 'रस' चाखा, तात्काळ आनंद लाभून मन प्रसन्न होईल—सद्यःपरनिर्वृति ! आणि त्यांतहि हीं काव्यें वाचून होणारा आनंद अळणी वाटूं लागला तर—आणि वाटणारच, कारण तेंच तें काव्य वाचून वाचून किती वेळां वाचायचें !—मग तांब्यांकडे वळा, तेथून रवींद्रांकडे, तेथून शेलीकडे ! कारण या सर्वांचा आणि ज्ञानेशांचा आद्य हेतु वा काव्यप्रयोजन एकच—'immediate pleasure' ! म्हणतात ना—श्वानं युवानं मघवानमाह ! तोच प्रकार ! म्हणूनच प्रार्थना की—ईश्वर बिचाऱ्या ज्ञानेश्वरांचें या मित्रांपासून रक्षण करो ! कारण अरे त्यांचे ख्यात-अख्यात-प्रख्यात कितीतरी मित्र आहेत !

२

हें सारें वाचून मित्र-मित्रेतर सर्वांच्याच मनांत अगदी साहजिकपणें प्रश्न उत्पन्न होईल की, मग काय ज्ञानेश्वरींत 'काव्य' नाही ? 'मित्र' म्हणतील—"इतक्या सरस, सुरस उपमादृष्टान्तांच्या मधुधारांचा नाजुक वर्षाव कालिदास-रवींद्रनाथांच्याहि काव्यांत आढळणार नाही. आहा, किती भावमयता, किती मार्दव, किती जिव्हाळा, किती हळुवारपणा, कोण नादमाधुर्य नि अर्थगौरव ! या ललित-कोमल-कान्त पदावलींत अभिजात उत्कृष्ट काव्याचें असें कोणतें लक्षण गवसत नाही म्हणून तिला 'काव्य' म्हणावयास नाकारावयाचें ? 'अहो, यांनी आपल्या बोलांनी अमृतालाहि पैजेने जिंकलें' अशीं अक्षरें रसिकांकडून खरोखरच मेळविणारे ज्ञानेश्वर जर कवि नाहीत तर मग कवि म्हणावयाचें तरी कुणाला हो ?"

खरें आहे. ज्ञानेश्वरांना नाही, तर मग कवि म्हणायचें कुणाला ? प्रश्न अमळ अशा निराळ्या तऱ्हेने टाकल्यास ठीक होईल—ज्ञानेश्वरांना जर कवि म्हटलें तर मग उरलेल्यांना काय म्हणायचें हो ?

प्रस्तुत प्रबंधांत याच प्रश्नाची यथाश्रुत, यथामति चर्चा करण्याचें योजलें आहे. सर्वसाधारणपणें असल्या चर्चेला ज्ञानेश्वरांचे 'मित्र' सोयीनुसार फक्त ज्ञानेश्वरीच आधार म्हणून घेत असतात. तसें न करतां, त्यांच्या समग्र प्रस्थानत्रयाचा—ज्ञानेश्वरी, अनुभवामृत, व पासष्टी यांचा—साकल्याने विचार करूनच ज्ञानेश्वरांच्या व्यक्तित्वाचें व ग्रंथांचें रहस्य आत्मसात् करण्याचा यत्न करावयाचा आहे हें आवर्जून सांगून ठेवणें बरें. कारण अशा चर्चेंत ही अत्यंत महत्त्वाची आणि निर्णायक गोष्ट बहुधा दुर्लक्षिली, नव्हे उपेक्षिली जात असते. काव्यविषयक या एकाच बाबतींत नव्हे, ज्ञानेश्वरांविषयी विचार करतांना बहुधा नेहमीच न कळत हा प्रमाद घडतांना दिसेल. साकल्याने निरपेक्ष

विचार फार थोडा होतो. म्हणून तर गैरसमजुतींना फावतें ! असो.

३

आपल्या मनाला विचार (thinking), भावना (feeling), आणि इच्छा (willing) असे तीन पैलू असतात हें समजाविण्यासाठी मानसशास्त्राचाच आधार घेतला पाहिजे असें नाही. प्रत्येकाच्या नित्याच्या अनुभवाची गोष्ट आहे ही. त्याचप्रमाणे हेंहि आपल्या नित्याच्या परिचयाचें आहे की, हे तिन्ही पैलू प्रत्येकाच्याच मनाला असले तरी प्रत्येकांत त्यांपैकी एखाद्याचें प्राधान्य असतें. बाकीचे पैलू नसतात असें नाही, पण त्यापैकी एखादा अधिक ठळक किंवा प्रमुख असतो. म्हणूनच एखाद्याला आपण 'विचारी स्वभावा'चा म्हणूं शकतों, कुणी एखादा 'भावनाप्रधान' ठरतो तर कुणी 'कर्मशील'. जगाशीं आपला संबंध याच 'त्रिविध' मनाने येत असतो. जगांतील वस्तूंची वा घटनांची आपल्यावर क्रिया होतांच तिच्या प्रतिक्रियेच्या स्वरूपांत आपल्या मनांत विचार उद्भवतात, भावनांचा उद्रेक होतो, आणि त्या संबंधांत कांही तरी करण्याची प्रवृत्ति उदय पावते.

आता, ही गोष्ट आपल्या सर्वांनाच अवगत आहे, किंवा ती समजणें सोपें आहे की, जगांतील समस्त 'काव्या'चें उगमस्थान वा अधिष्ठान मनांतील हा भावनेचा पैलूच ( the feeling psyche ) होय. इतर पैलूंचा अभाव नसला तरी, ज्यांचे ठायीं या विशिष्ट पैलूचा प्रकर्ष असतो त्यांनाच सर्वसाधारणपणें आपण 'कवि' म्हणत असतों. 'विचारा'चा प्रकर्ष असल्यास माणूस 'तत्त्वज्ञ' ( philosopher ) ठरतो व 'इच्छाशक्ती'चा असल्यास 'कर्मी' ( dynamic worker ) गणला जातो. म्हणून साधारणतः असें ठोकळ विधान करतां येईल की, मनावर जगाची क्रिया होतांना ज्यांच्या भावनाच प्रामुख्याने चाळविल्या जातात, आणि तद्द्वारा येणारा जगाचा अनुभव जे आपल्या भावनाशील

मनाने भावनात्मक रूपांत व्यक्त करीत असतात तेच कवि होत. म्हणूनच काव्य केवळ सहृदयहृदयसंवेद्य असतें असें आपण मानतों. आनंदवर्धन म्हणतो की, काव्याचा आत्मा 'सहृदयश्लाघ्य' असतो.

●

वरील विश्लेषणांतून एक अत्यंत महत्त्वाचा निष्कर्ष निघतो. तो असा की, स्वतःच्या भावनामृदु मनाने कवीला जगाचा जो अनुभव येत असतो तोच भावनात्मक आणि भावनासंवेद्य रूपांत तो आपल्या काव्यांतून व्यक्त करीत असतो. सारांश, कवींच्या 'अनुभवा'चें गद्यपद्यात्मक वाङ्मय रूप म्हणजेच काव्य वा साहित्य. आणि म्हणूनच या 'अनुभवा'च्या दर्ज्यावरून नि स्वरूपावरून तज्जनित काव्याचा दर्जा वा स्वरूप ठरणार—त्याचें मूल्यमापन होणार, हें ओघानेच आलें. काव्यांतील वा साहित्यांतील या 'अनुभवा'ची महती आजकाल बरीच गाइली जात असते. आणि या 'अनुभवा'चा विपर्यस्त वा विकृत अतिरेक न झाल्यास त्याची ही महती रास्तहि आहे. सुप्रसिद्ध ऑस्ट्रियन कवि रिल्के याने म्हटलें आहे की, "Verses, as some people imagine, are not mere feelings, but experiences". म्हणजे, कित्येकजण समजतात त्याप्रमाणे कविता ही निव्वळ फेसाळ भावनेचाच खेळ नसते तर ती अनुभूतीची अभिव्यक्ति असते. या विधानांतहि काव्यांतील 'अनुभवा'चें स्थान सुंदर, मार्मिक रीतीने स्पष्ट केलें गेलें आहे.

कवीचा हा 'अनुभव' त्याच्या मनाच्या घडणीनुसार विशिष्ट तऱ्हेने व्यक्त झाला की त्याला आपण काव्य म्हणतों. या काव्याची—त्याच्या देहाच्या नि आत्म्याच्या स्वरूपाची नाना साहित्यशास्त्र्यांनी नाना तऱ्हेने चर्चा केली आहे. 'काव्यं रसात्मकं वाक्यम्' यापासून तों 'काव्य म्हणजे गेय सौंदर्यनिर्मिति'पर्यंतच्या प्राचीन व आधुनिक

नवुक्रम ७५६३८ दि: निवृत्ती
क्रमांक २२०१ २०।३।०७


काव्यलक्षणांमधील प्रमुख नि महत्त्वाचीं बहुतेक सर्व लक्षणें आपल्याला ज्ञानेश्वरींत आढळतात, यांत शंकाच नाही. आणि तेवढ्यावरूनच कित्येक पल्लवग्राही पंडित तिला काव्य ठरवून आणि ओघानेच तिच्या कर्त्याला कवि ठरवून मोकळे होतात. ज्ञानेश्वर हे कालिदासादिकां-सारखेच कवि असणें खरोखर शक्य आहे काय, ते कवि असतीलच तर कोणत्या अर्थाने, हें विचारपूर्वक समजून घेण्याची या पंडितांना गरजच भासत नाही. आपलें एखादें लाडकें मत सिद्ध करण्याचा स्वार्थी हव्यास, सखोल चिकित्सक दृष्टीचा अभाव, जीवनांतील मूलभूत मूल्यांचें दयनीय अज्ञान वगैरे दोषच असले सिद्धान्त बांधण्यास कारणीभूत होतात. ही प्रवृत्ति किती आत्मघातक आहे हें आपण प्रारंभींच पाहिलें आहे. असो.

सखोल चिकित्सक दृष्टीचा अभाव असें जें वर म्हटलें आहे तें एवढ्याचसाठी की, ज्ञानेश्वरांना कवि नि ज्ञानेश्वरीला काव्य ठरवितांना फक्त 'ज्ञानेश्वरी'चाच विचार करण्यांत येतो, 'ज्ञानेश्वरां'चा नाही! म्हणजे असें की, ज्ञानेश्वरांच्या जगविषयक 'अनुभवा'चें वाङ्मय वा बाह्य 'रूप' जी ज्ञानेश्वरी तिचीच चिकित्सा होते. परंतु खुद्द ज्ञानेश्वरांच्या त्या जगविषयक 'अनुभवा'चें स्वरूप काय, इतर कवींचा जगविषयक 'अनुभव' नि ज्ञानेश्वरांचा 'अनुभव' एकाच दर्ज्याचे, एकाच पातळीवरील नि एकाच कोटींतील आहेत की नाहीत, त्या दोन 'अनुभवां'त केवळ परिमाणगतच भेद आहे की अजीबात प्रकारगत मूलभूत पार्थक्य आहे, सारांश ज्ञानेश्वरांचें व्यक्तित्व आणि इतर कवींचें व्यक्तित्व यांत काय, किती, कसा आणि कुठे फरक आहे इत्यादि मुद्यांकडे मुळी लक्षच दिलें जात नाही. म्हणून तर यांना 'मित्र' म्हणायचें! म्हणून तर ज्ञानेश्वरांसारख्या महापुरुषाच्या 'अनुभवा'च्या अमृतसरोवरांत डुंबूनहि अंतःपरिवर्तनाच्या दृष्टीने आपण

तसेच कोरडे पाषाण राहत असतों ! अगदी सौम्य मराठींत अशांनाच कपाळकरंटे म्हणत असतात !

४

असो. ज्ञानेश्वरांचा जगाविषयीचा 'अनुभव' काय होता बरें ? ज्ञानदेवांच्या जीवनांतीलच एक प्रसंग. चांगदेवांचें कळकळीचें पत्र आलें—भेटीची मनापासून इच्छा दर्शविली होती. छांदोग्य उपनिषदांतील नारद-सनत्कुमारांची भेट डोळ्यांसमोर उभी राहते. ती आख्यायिका, ही सत्यकथा ! कृतकर्तव्य, सर्वविद्यापारंगत वयोवृद्ध नारद आत्मविद्येच्या अभावीं शोकाकुल होऊन बालतापस सनत्कुमारांना शरण गेले, आणि त्या 'पोरा'ने त्यांना भूमानंदाचा मार्ग दाखविला. त्या आख्यायिकेचा हा जणु अभिनयच--इतक्या शतकांनी ! उत्तरादाखल आळंदीचे हे सुकुमार ब्रह्मकुमार चांगदेवांना लिहितात—"चांगदेवा, तुम्ही माझी भेट घेऊं इच्छितां, कारण तुम्ही, मी, आणि आपली भेट, या तिन्ही गोष्टी अनुभवास येतात तशाच सत्य आहेत अशी तुमची आज 'जाणीव' आहे. पण माझी जाणीव, माझा तद्विषयक 'अनुभव' अगदी निराळा आहे. तो असा की, हें 'दृश्य द्रष्टृत्व अविद्यानिमित्तें वर्ते'. पण 'तें मी नेणें'--माझ्या 'अनुभवां'त मी, तुम्ही, नि आपली भेट हे घटकच नाहीत. कारण हा 'जगदाभासु' ही तीनपणाची 'भ्रांति' निवृत्तिराजांनी जें 'स्वानुभव' रसाळ खाजें (मिष्टान्न) दिधलें त्यामुळे कायमची तिरोधान पावली आहे. मग मला या बाबतींत प्रतीति काय येत आहे हें विचाराल तर सांगतों. माझा 'अनुभव' असा आहे की तें 'अतीत दृङ्मात्रच द्रष्टादृश्यमिसें केवळ होय' ! तें एकमेवाद्वितीय आनंदस्वरूप चैतन्यच तुमच्या, माझ्या, समस्त जगाच्या रूपाने लेलायित झालेलें आहे, अंतर्बाह्य सर्वत्र त्या अद्वितीय लीलामयाचाच महिमा वा विभूति विस्तारलेली आहे असा मला सतत 'अनुभव' येत आहे. 'सुताचिये

गुंजे, आंत बाहेर नाही दुजें' असा माझा बोध आहे. तुम्ही भ्रांतींत आहां म्हणून तुम्हांला मी, तुम्ही, नि आपली भेट अशी जाणीव होत आहे. पण माझ्या दृष्टीने तुमची-माझी भेट तर 'सिद्धभेट'च आहे". स्वतःविषयीचा व जगाविषयीचा ज्ञानेश्वरांचा 'अनुभव' हा असा आहे! आणि तोच त्यांच्या पासष्टी 'काव्यां'त प्रतिपदविन्यासांतून व्यक्त होत आहे.

आपल्या अनुभवामृत-काव्याच्या अखेरीस हे कवि म्हणतात की, या अनुभवामृताच्या द्वारा आम्हीं 'स्वानुभूति परगुणें वोगरिलें' आहे—आमच्या अनुभवाच्या पक्वान्नाची मेजवानी दिली आहे. आणि ती स्वानुभूति काय? तर--'मूलायाग्राय मध्याय मूलमध्याग्रमूर्तये। क्षीणाग्रमूलमध्याय नमः पूर्णाय शंभवे ॥'—तो एकच स्वयंज्योति स्वयंभु नटराज या जगताच्या रूपाने नटला आहे, आदीं मध्यीं अवसानीं सर्वत्र तोच. जगत् म्हणून जें दिसतें तें त्याच्या ठिकाणीं 'क्षीण' आहे —मिथ्या आहे. आंतबाहेर त्या एकाच चैतन्याचा विलास--सर्वत्र चिद्विलास! 'मी आणि जगत्' हा मिथ्या सर्पभ्रम ज्या वेळीं रज्जुज्ञानाने संपूर्ण तिरोहित होतो त्या वेळीं अंतर्बाह्य त्याच परंधामाचें दर्शन घडतें की जो 'सर्व शून्याचा निष्कर्षु, इया बाइला केला पुरुषु'! हें ज्ञानेशांचें व्यक्तित्व, ही त्यांची जाणीव, आणि हा त्यांचा जगाचा अनुभव! तोच त्यांच्या अनुभवामृत काव्यांतून प्रकट होत आहे.

आता उरलेल्या ज्ञानेश्वरी नामक महाकाव्याकडे वळूं या. कवि 'स्वानुभव' व्यक्त करीत उद्गारतात—'मावळवीत विश्वाभासु, नवल उदयला चंडांशु, अद्वयाब्जिनीविकाशु, वंदूं आता'!—'अहो, माझ्या जीवनगगनांत उगवलेला हा चित् सूर्य किती विलक्षण आहे! साधारण सूर्य उगवल्याने जगत् प्रतीयमान होतें तर ह्या सूर्याच्या उदयाने जगत् निव्वळ आभास ठरून पूर्णतया मावळून गेलें! आणि त्याच्या

किरणांनी अद्वैत-अनुभवाचें कमल विकसून आंतबाहेर सर्वत्र तो एकमेवाद्वितीय आनंदमय अनुभवास येत आहे !"।

सनत्कुमारांनीहि नारदांना असाच स्वानुभव, हेंच स्वतःचें जीवन-दर्शन उपदेशून शोकाच्या पलीकडे नेलें होतें. सनत्कुमार म्हणतात—

"यो वै भूमा तत् सुखम्। न अल्पे सुखम् अस्ति। यत्र न अन्यत् पश्यति, न अन्यत् शृणोति, न अन्यत् विजानाति स भूमा। अथ यत्र अन्यत् पश्यति, अन्यत् शृणोति, अन्यत् विजानाति तत् अल्पम्। यो वै भूमा तत् अमृतम्। अथ यत् अल्पम् तत् मर्त्यम्।"

अर्थात् "जिथे मीं-तूं अशी जाणीव असते, जिथे भोक्ता-भोग्य-भोग असा बोध असतो तें अल्प होय. जिथे असली जाणीव, असा बोध नसतो तो भूमा होय. अल्पामधे चिरंतन सुख कदापि लाभावयाचें नाही, कारण तें परिवर्तनशील, विनाशी आहे. खरें सुख, खरा आनंद भूमा-जीवनांतच. त्या अमृत-अनुभवानेच माणूस चिरकृतार्थ होत असतो".

सनत्कुमार पुढे म्हणतात—

"स भूमा एव अधस्तात्, स उपरिष्टात्, स पश्चात्, स पुरस्तात्, स दक्षिणतः, स उत्तरतः, स एव इदं सर्वम्।"

एकदा त्या भूमा-स्वरूपाचें दर्शन झालें की मग हा जगदाभास, हा सर्पभ्रम, ही भोग्यभोक्त्याची जाणीव, ही भोगाची चिर-अतृप्त, अदम्य पण दुःखैकपर्यवसायी स्पृहा अंतर्धान पावते. मग दिसूं लागतें, मग प्रत्यक्ष अनुभवास येऊं लागतें की, ज्याला अज्ञानाने 'मी नि जग' समजत होतों तें म्हणजे त्याच आनंदसागराचा ऊर्मिमय विलास होय. मग आंत-बाहेर मागे-पुढे चहूकडे खरोखरच आनंदी आनंद ! कारण जड-चेतन, नर-नारी, कुमार-कुमारी, सुंदर-असुंदर, सुख-दुःख सर्वकांही तोच भिन्नभिन्न उपाधींनी उत्स्फूर्त झालेला आहे—आपल्या

अनिर्वचनीय मायाशक्तीने प्रतीयमान होत आहे.

ज्ञानेश्वरांना तो भूमा लाभला होता. त्यांच्या तिन्ही ग्रंथांमधील आत्मकथनावरून त्यांची स्वतःविषयीची नि जगाविषयीची 'अनुभूति' काय होती हें वर पाहिलेंच आहे. 'नाना कल्लोळमाळिकें पाणि जेवि' —म्हणजे नाना लाटांच्या रूपांनी जलसागरच ज्याप्रमाणे कल्लोळत असतो त्याचप्रमाणे 'नाना बोधाचिये सोयरिके, साचपण जेणे एके'— तो एकच बोध नाना उपाधिमय रूपांनी विलसत असतो. त्या बोधाचा हा जगन्मय विलास ते सतत अनुभवीत होते, तो चिद्विलासच ज्ञानेश्वरांचा जगाचा 'अनुभव' होता. त्या बोधांत त्यांची प्रज्ञा कायमची स्थित झालेली होती. हें त्यांचें स्थितप्रज्ञ व्यक्तित्व, ही त्यांची अपरोक्ष 'अनुभूति'च त्यांच्या प्रस्थानत्रयाच्या पानापानांतून, शब्दाशब्दांतून, उपमादृष्टान्तांचीं छंदोमय लोभसवाणीं रूपें घेऊन साकार झालेली आहे.

५

असो. ज्ञानेश्वरांच्या 'अनुभवा'कडून आता त्यांच्या ग्रंथ-प्रयोजनाकडे वळल्यास काय दिसेल ? गुरुदेवांच्या कृपा-पुनवेने ज्ञानेश्वरांच्या बोधचंद्राच्या विखुरलेल्या कळांची मेळवणी झाली होती. मायाकुंजरु मोडून निवृत्तिनाथांनी त्यांना मुक्तिमोतियाचा चोगरु जेवविला होता—भ्रमनिरास होऊन त्यांना सम्यक्‌दर्शन प्राप्त झालें होतें. या दिव्य दर्शनाने जीवनाच्या समस्त समस्या सुटल्याकारणें चिरतृप्ति लाभून आपल्या हृदयगाभाऱ्यांत असीम आनंद सदा गरगरतो आहे हें त्यांना प्रत्यक्ष दिसत होतें. आणि स्वतःच्या तुलनेने दिसत होती इतरांची केविलवाणी दशा. दिसत होतें—प्रत्येकाच्या हृदयांत त्याच आनंदाचा कंद असूनहि त्याचें संधान न साधल्यामुळे लोक विश्वांतील प्रत्येक ' फसव्या ' वस्तूपुढे तोंड वेंगाडून सुखाची

भिक्षा मागत दुःख भोगीत वणवण फिरत आहेत ! अरेरे !—पाहून विश्वप्रेमिक विठ्ठल झाला, अकारणदयासिंधु हेलावला. 'अवघा संसार सुखाचा करीन, तिन्ही लोक आनंदें भरीन' अशी लोककल्याण-कामना त्यांच्या समाधिलीन चित्तांत स्फुरूं लागली. आणि तुम्हांआम्हां करंट्यांना आनंदाच्या केवळ आभासासाठी तोंडांतून फेस गाळीत या मृगजळामागे धावण्यापासून परावृत्त करून खऱ्या, स्वाधीन आनंदाचें संधान सापडावें म्हणून आपल्या 'अनुभवा'स व्यक्त रूप देऊं जातां, त्यांचे द्वारा या ब्रह्मरसरुचिर, ल्हादैकमय प्रस्थानत्रयीची निर्मिति झाली. त्यांचेच शब्द आहेत—"म्हणौनि भलतेणें एथ सद्भावें नाहावें, प्रयागमाधव विश्वरूप पहावें, येतुलेनि संसारासि द्यावें, तिळोदक ...हें अल्पचि परि उघडें कैवल्य एथ"—वाटेल त्याने या तीर्थांत भक्तिभावाने स्नान करावें नि येथे भगवंताच्या विश्वरूपाचें दर्शन घेऊन जन्ममरणरूप संसारांतून मुक्त व्हावें; येथे मोक्ष अगदी उघड आहे, सहजलभ्य आहे (ज्ञानेश्वरी). "सिद्धानुवाद लाहों आवडी करूं"—जें सिद्ध आहे, जो आनंद प्रत्येक मानवाचा जन्मसिद्ध अधिकार आहे त्याचेंच आम्ही प्रेमप्रेरित होऊन वर्णन करीत आहों. कशासाठी ?—विदग्ध रस पिकवून 'रसिकां'चें मनोरंजन करण्यासाठी ? नाही नाही, "ज्ञानदेवो म्हणे श्रीमंत, हे अनुभवामृत, सेवोनि जीवन्मुक्त, हेंचि होतु"—हें माझ्या अनुभवाचें अमृत पान करून तुम्ही माझ्याच सारखे जीवनाच्या भगभगीपासून, समस्त कटु-कठोरतेपासून मुक्त व्हाल. मग—मग तुम्हांला आनंदाची भीक मागत फिरावें लागणार नाही. 'स्वानंदसाम्राज्याचे चक्रवर्ती'—खरे खरे श्रीमंत होऊन तुमची सुखाची ददात कायमची मिटेल ! (अमृतानुभव). "जो इया, दर्पण करील ओविया, तो आत्माएवढिया, मिळेल सुखा"—या आमच्या ओव्यांच्या आरशांत जो आपलें स्वरूप न्याहाळील तो विश्वमय अनंत

आनंद पावेल (पासष्टी).

६

हें असें आहे ज्ञानेश्वरांचें 'व्यक्तित्व', हा असा आहे त्यांचा 'अनुभव' आणि हें आहे त्यांच्या ग्रंथांचें 'प्रयोजन'.

पण मग त्यांच्या ग्रंथांत आढळणाऱ्या अद्भुत काव्यगुणांचें काय ? त्यांचा अर्थ नि संगति कशी लावणार ?

कोणत्याहि भावनाप्रवण व्यक्तीला आनंद झाला की ती व्यक्ति आपला तो आनंद मोठ्या गोड, लडिवाळ शब्दांत, हृदयंगम रीतीने व्यक्त करीत असते. ज्यांच्या मनाचा भावनेचा पैलू (Feeling psyche) अधिक पुष्ट नि संवेदनाक्षम असतो त्यांचे ठायीं कमीअधिक प्रमाणांत 'स्वभावतः'च मार्दव, सादर्यदृष्टि, रसाळ वृत्ति, कलात्मकता, कल्पनाप्रियता, लालित्य, हळुवारपणा इत्यादि कोमल गुण नांदत असतात. हे भावनाजन्य गुण त्यांच्या अगदी रक्तांतच असतात, त्यांच्या जणु पाचवीलाच पुजलेले असतात ! ते त्यांचे मनोधर्मच होत, त्यांच्या मनाचा पिंडच त्या गुणांच्या उपादानाने निर्मिलेला असतो. 'विचार'-प्रधान व्यक्तीचे गुण वा मनोधर्म निराळे आहेत. म्हणूनच "ज्यांचें आकलन मोठ्या बुद्धिमंतांनाहि प्रयासानेच व्हावें असे अत्यंत गहन विषय शंकराचार्यांसारख्या तत्त्वज्ञांनी साहित्यांतील लालित्यादि सौंदर्यतत्त्वांचा यत्किंचित् उपयोग न करतां पराकाष्ठेचे सुलभ करून सोडले आहेत". मनोरचनेची वा मनोधर्मांची भिन्नताच ह्याचें एकमेव कारण होय. 'विचारां'चा पैलू ( Thinking psyche ) ज्यांचा पुष्ट असतो त्यांचे मनोगुणच भिन्न असतात. म्हणून तर त्यांच्या लिखाणाला 'काव्य' वा 'साहित्य' हें आडनांव कुणीहि देणार नाही. पण एवढ्यानेच ज्ञानेश्वरांच्या आणि शंकराचार्यांच्या मूलभूत 'अनुभूतीं'त वा ग्रंथ-प्रयोजन प्रभृतींत फरक कसा पडणार ? 'कर्मशील' व्यक्तीच्या मनाची

घडण वेगळी, म्हणून तिचे मनोगुणहि आणखीच निराळे. एकच अनुभूति व्यक्त करायची झाली तरी हे तिघे आपापल्या मनोधर्मानुसार तीन प्रकारांनी करतील,—मग ती अनुभूति लौकिक ( empirical ) असो की अ-लौकिक ( transcendeatal ) असो. पाहाना, ही एकच चिद्विलासाची अनुभूति, हा एकच अद्वैत-अनुभव आचार्य शंकरांनी 'विचारां'तून एका तऱ्हेने मांडला आहे, ज्ञानेश्वरांनी 'भावनें'तून दुसऱ्या रीतीने वर्णिला आहे, तर विवेकानंदांनी 'कर्मां'तून वा 'शिवभावें जीवसेवें'तून तिसऱ्याच प्रकारें व्यक्त केला आहे. अंतर्गत अनुभूति एकच असली तरी, मनाच्या ज्या पैलूमधून ती प्रकट होते त्याच्या स्वभावगुणांचा रंग तिला चढत असतो. एकच अरूप विद्युत् निळ्या गोलकांतून प्रकट झाल्यास निळी भासते, हिरव्यांतून हिरवी नि पिवळ्यांतून पिवळी. लहान बालकें हें तारतम्य ठेवूं शकत नाहीत. बालिश बुद्धीचे आपणहि शंकराचार्यांना 'तार्किक', ज्ञानेश्वरांना 'कवि' नि विवेकानंदांना 'कर्मी' ठरवून आपल्या मूढ बहिर्मुखतेचें हास्यास्पद प्रदर्शन करीत असतों !

७

तात्पर्य काय की 'भावना'-प्रधान माणसाच्या प्रत्येक अभिव्यक्तींतच 'भावना'जन्य गुण आढळून येतील. ज्ञानदेवांच्या मनाचा 'भावने'चा पैलू अत्यधिक विकसित नि परिपुष्ट होता—प्रमुख होता. पण त्याबरोबरच, त्यांना जीवनाच्या यथार्थ मूल्याचें साक्षात् दर्शन घडून अ-लौकिक, अतुलनीय भूमानंदाची प्राप्ति झालेली होती. त्यांच्या स्वतःच्या बोधांत 'ज्ञानेश्वर'हि नव्हते नि 'जगत्'हि नव्हतें ! होता फक्त त्या लीलामयाचा चिद्विलास—अंतर्बाह्य सर्वत्र. आणि तुमच्या आमच्या कल्याणकामनेने प्रेरित होऊन आपल्या या सम्यक्दर्शनास वा आनंदानुभूतीस व्यक्त रूप देऊं जाऊन, भावनाशील व्यक्तीच्या

नैसर्गिक मनोरचनेनुसार अगदी स्वाभाविकपणें, अगदी अपरिहार्यपणें त्यांचे द्वारा इतकी हृद्य, ललितसुंदर, भावनात्मक नि भावनासंवेद्य वाङ्मयी निर्मिति झाली. ह्याच कारणास्तव वरवर 'काव्य' वाटत असले तरी वस्तुतः त्यांचे मोक्षप्रद ग्रंथ त्यांच्या त्या अपरोक्ष 'अनुभूती'चाच ललित विस्तार, भावनारम्य आविष्कार होत. आणि म्हणून, अपरोक्षानुभूतिव्यंजक त्यांच्या रससिक्त प्रतिपदपंक्तींत काव्यगुण अगदी ओतप्रोत अनुस्यूत असले तरी त्यांचे ग्रंथ रूढ अर्थाने 'काव्य' कदापि ठरणार नाहीत. आणि म्हणूनच इतक्या ठिसूळ आधारावर ज्ञानेश्वरांना रूढ अर्थाने 'कवि' ठरवून कालिदासादिकांच्या पायरीस ओढण्याचा उपद्व्याप म्हणजे निव्वळ निर्बुद्धताच नव्हे, तर घोर आत्मवंचना नि अघोर आत्मघातच होय. तथापि हेंहि तितकेंच खरें की, रूढ अर्थाने नसले तरी आणखी एका अर्थाने ज्ञानेश्वर, आणि ज्ञानेश्वरच यथार्थ कवि होत. उपनिषदांतील 'न तत्र सूर्यो भाति' इत्यादि मंत्रांचे द्रष्टे, वा वेदांतील 'नासदीय' सूक्ताचे उद्गाते ऋषि ज्या अर्थाने कवि, त्या अर्थाने, आणि त्याच अर्थाने ज्ञानेश्वरहि कवि होत. भागवतामधील राधा-कृष्ण प्रेमाचें भावमधुर वर्णन करणारे जन्मसिद्ध, अपापविद्ध संन्यासीप्रवर शुकदेव ज्या अर्थाने कवि, त्याच अर्थाने ज्ञानदेवहि कवि. पण पुन्हा तोच प्रश्न—मग उरलेल्यांना काय म्हणायचें ! असो, याची सुविस्तृत चर्चा पुढे यथास्थानीं करावयाची आहेच. आता-पर्यंतच्या विवेचनावरून तूर्त तरी हेंच स्पष्ट आहे की रूढ अर्थाने ज्ञानेश्वर कवि नाहीत आणि त्यांचे ग्रंथ पण काव्य नाहीत.

---

# कवि ज्ञानेश्वर

## ( उत्तरार्ध )

ज्ञानेश्वरांच्या ग्रंथांत असामान्य काव्यगुण आढळत असले तरी त्यांचे ग्रंथ रूढ अर्थाने 'काव्य' कां नाहीत, आणि ज्ञानेश्वरहि वरवर वाटत असले तरी रूढ अर्थाने 'कवि' वा 'साहित्यिक' कां नाहीत हें आपण पाहिलें. त्याबरोबरच, त्यांच्या सम्यक्‌दर्शी व्यक्तित्वाच्या व भावनाप्रवण विशिष्ट मनोरचनेच्या प्रकाशांत, त्यांच्या ग्रंथांत आढळणाऱ्या काव्यगुणांची सुसंगत उपपत्ति कशी लागते हेंहि आपण पाहिलें. आणि ही वस्तुस्थिति डावलून केवळ आपल्या विदग्ध रसवृत्तीच्या संतोषार्थ त्यांच्या ग्रंथांचें अध्ययन केल्यास काय आणि किती हानि होते हेंहि आपण पाहिलें. असें असतां, "त्यांची मूळ भूमिका कवीची होती" हेंच त्यांच्या ग्रंथांतील रसाळपणाचें, अतिरेकी हळुवारपणाचें कारण होय असें कसें मानतां येईल ? "रसज्ञ श्रोत्यांना प्रतिभेचा मनोज्ञ विलास दाखविणें हाच ज्ञानेश्वरांचा प्रधान हेतु असून, असा कलाविलास दाखविण्यासाठी कांहीतरी निमित्त हवें म्हणून या प्रबंधाची रचना त्यांनी केली" असा त्यांचा आशय मानणें त्यांच्या

'जीवना'कडे बघितल्यास हास्यास्पद नाही का होणार? "आपण काव्य लिहीत आहोंत, साहित्य निर्माण करीत आहोंत हेंच पहिल्यापासून शेवटपर्यंत ज्ञानेश्वरांच्या मनांत होतें" हें म्हणणें खरें आहे काय? कितीहि संशोधनपाटव आणि अध्ययनकौशल्य खर्च केलें तरी "अध्यात्मविद्येचें तर्कशुद्ध व प्रभावी प्रतिपादन करण्याच्या लालसेपेक्षा रसप्रकर्ष व विविध काव्यसौंदर्य निर्माण करण्याची लालसाच त्यांच्या मनांत अधिक प्रबळ होती" असें सिद्ध करतां येईल काय? लटपट, आटापिटा करून नि वडाचो साल पिंपळाला डिकवून अर्थातच कांहीहि सिद्ध होऊं शकेल म्हणा! त्याबद्दल एखादें विद्यापीठ तुमची पाठहि थोपटील. पण ज्यांना यथार्थ जीवनमूल्यांची थोडी तरी प्रामाणिक चाड आहे त्यांना असला खटाटोप अव्यापारेषु व्यापारच वाटेल. कारण,—मुमुक्षिभिः काव्यरसो न पीयते!

२

आता, या काव्यरसावरच निर्वाह करणाऱ्या, रूढ अर्थाने ज्यांना आपण कवि म्हणतों त्यांच्याकडे व त्यांच्या काव्याकडे वळल्यास काय आढळतें? आढळतें—"सत्यानृते मिथुनीकृत्य अहमिदं ममेदम् इति नैसर्गिकोऽयं लोकव्यवहारः"—सर्वसाधारण लोकांप्रमाणे 'मी आणि जगत्', भोग्य-भोक्ता, सभोवार जें कांही दिसतें तें दिसतें तसेंच सत्य आहे अशा लौकिक (empirical) बोधांतून निःसृत झालेलीं केवळ इंद्रियगोचर जगतामधील वस्तूंचीं नि घटनांचीं इंद्रियसुभग वर्णनें. ह्या लौकिक कवींच्याहि मनाचा 'भावने'चा पैलू (the feeling psyche) विकसित नि पुष्ट असतो. मनाला आणि इंद्रियांना गम्य अशा या जगांतील वस्तूंची व घटनांची त्यांच्यावर प्रतिक्रिया होऊन आलेला 'अनुभव' हेहि भावनेच्या माध्यमांतूनच भावमधुर रूपांत व्यक्त करीत असतात. पण ह्यांचा हा 'अनुभव' किती वेगळा!

ह्यांचें 'जग' किती निराळें! ह्यांचें 'मन' किती अलग! त्यांचें (ज्ञानेश्वरांचें) आणि ह्यांचें (लौकिक कवींचें) सर्वच पृथक्, सर्वच भिन्न—अगदी 'प्रकारगत' पार्थक्य! "यत्र अन्यत् पश्यति, अन्यत् शृणोति, अन्यत् विजानाति तत् अल्पम्"—जिथे मी-आम्ही, तूं-तुम्ही, तो ती तें-ते त्या तीं हीच जाणीव शयनीं-स्वपनीं-जागरणीं सदा स्पंदत असते, त्यालाच सनत्कुमारांनी 'अल्प' म्हटलें आहे. त्यांचें सर्वच भूमा, ह्यांचें सदा 'अल्पां'तच घुटमळणें—'जग' ससीम, 'मन' ससीम, 'अनुभव' ससीम! मृगजळाच्या सत्यतेनेच ह्यांचें समग्र जीवन भारलेलें, सर्पभ्रमच यांची स्वाभाविक अवस्था! मृगजळाच्या उन्मादक संमोहाने सदा संमोहित, सर्पभ्रमाच्या भ्रांतीने सदा विमोहित—कधीच त्या मरुभूमीशीं संबंध नाही, त्या रज्जूशीं संस्पर्श नाही. दिसतें आहे त्याच्या सत्यमिथ्यतेबद्दल कधी संदेह देखील नाही! आजन्म-आमरण स्वतःच्या व जगाच्या अ-परमार्थ रूपाशींच संबंध, परमार्थ रूपाची कल्पनाहि नाही.

●

बघाना—ह्यांचें 'जग' किती निराळें असतें! पंच इंद्रियांना आणि मनाला गम्य—बस्, एवढेंच यांचें 'जगत्'—देश-काल-निमित्ताने सीमित—नाम-रूपांनी मर्यादित. हेंच जग, यांतीलच वस्तु आणि घटना ह्यांच्या काव्य-साहित्यांचे विषय. पण जग 'खरोखरच' असेंच नि एवढेंच आहे काय? कवींच्या ह्या जगाविषयी, ज्यांनी 'उभयोरपि दृष्टोऽन्तः' ते भगवान श्रीकृष्ण म्हणतात—"विष्टभ्याहम् इदं कृत्स्नम् एकांशेन स्थितो जगत्"—अर्जुना, तूं ज्याला जगत् म्हणून समजतोस तें हें सर्वचें सर्व माझा फक्त एक अंशच होय, ती माझी केवळ आंशिक अभिव्यक्तिच होय! सागरांत तरंगणाऱ्या हिमनगाचा एकदशांश भागच साधारणांना दिसत असतो. जे जाणते

असतात त्यांनाच पृष्ठभागाखालील नऊदशांश आणि वरील एकदशांश अशी त्याच्या एकूण स्वरूपाची पूर्ण कल्पना असते. सर्प त्या रज्जूची आंशिक अभिव्यक्तिच होय--'खरा' सर्प म्हणजे 'रज्जु अधिक सर्प' --ती रज्जुच सर्परूपाने लेलायित आहे. तोच 'पूर्ण' सर्प. ह्या कवींना त्या रज्जूच्या अस्तित्वाची दखलहि नसते, त्यांना फक्त सर्प दिसत असतो, आणि तेंच त्यांचें 'जग'. ह्यांनाहि जगाचा 'अनुभव' येतो खरा, पण 'संपूर्ण' जगाचा कधीच अनुभव येत नाही, सदा अंश-मात्राचाच. हें इंद्रियगम्य जग दिसतें त्या स्वरूपांत मिथ्या, असत्, माया असून 'वस्तुतः' त्या लीलामयाची लीला आहे, चिद्विलास आहे असा ज्यांना जगाचा अनुभव येतो त्यांनाच 'संपूर्ण' जगाचा अनुभव येतो. कारण वस्तुस्थितिच अशी आहे की, "पादः अस्य विश्वा भूतानि, त्रिपाद् अस्य अमृतं दिवि"—हीं समस्त भूतें, हें निखिल वस्तुजात त्या सत्याचा एक पाद वा अंश होय, आणि हा अंश मर्त्य आहे. त्याचें अमृत स्व-रूप देश-कालाच्या अतीत आहे. ह्या कवींना 'जग' म्हणजे फक्त हा मर्त्य, व्यक्त पाद; ज्ञानेश्वरादिकांना 'जग' म्हणजे हे चारहि पाद. कारण त्यांना सम्यक् दर्शन घडलेलें असतें की जो नित्य तोच लीलेंत जगन्मय – त्या सत्-चित्-आनंदाचेंच हें विश्वरूप होय. "अहो ऐक्याचें मुदल न ढळें, आणि साजिरेपणाचा लाभ मिळें, तरी स्वतरंगाचीं मुकुळें, तुरंबू कां पाणी ?"—आपलें उदकपण न मोडतां सागर आपल्याच तरंगांचीं सुमनें शिरीं धारण करून शोभायमान होत असतो. ज्ञानेश्वरांचें 'जग' हें असें नि एवढें ! आणि ह्या कवींचें ? बिचारे जन्मभर 'अनुभव' 'अनुभव' करीत 'संपूर्ण' जगाचा पुरेपूर अनुभव मिळावा म्हणून धडपडत असतात. पण कितीहि धडका मारल्या तरी देश-कालाच्या, नाम-रूपांच्या अभेद्य दगडी भिंतीवर आपटून आपटून अखेर कपाळमोक्ष ! तीं भिंताडें

जशींच्या तशींच उभीं, त्यांच्या पलीकडे जें जग आहे, जें अस्तित्व आहे त्याचा अनुभव ह्यांच्या नशिबीं नाही. ह्यांचें सारें जगत् ह्या नाम-रूपांच्या क्षितिजाच्या वर्तुळसीमेंत. आणि या सीमेंतहि "जें हातीं लागतें तेंहि मायानगरींतील प्रासादासारखेंच मायावी ठरतें. . . .दूरवर, क्षितिजावर दिसणारी आशेची, समाधानाची ज्योत कवळावयाला जायचें हेंच जीवित. जवळ जवळ म्हणून तुम्ही जितकें तिच्याकडे धांवाल, तितकें तें क्षितिज आणि ती ज्योत दूरदूर सरकते. तुमच्यांतील तें अंतर भूमंडळ तुडवूनहि तुटावयाचें नाही". शिव शिव, किती केविलवाणी दशा ही! पण याच जगाविषयी आणि त्याच्या क्षितिजा-पलीकडे तेवणाऱ्या ज्योतीविषयी ज्ञानेश्वर काय म्हणतात? "समग्रही दीप्ति घेतां, जेवीं दीपुचि ये हाता, तेंवी जियेचिया तत्त्वता शिवुचि लाभे"! ज्ञानेश्वरांना जगत् म्हणजे त्याच ज्योतीचा प्रकाश, त्याच स्वयंज्योति लीलामयाचा लीलाविलास—पूर्णात् पूर्णम् उदच्यते! आणि 'संपूर्ण' जगाचा पुरेपूर अनुभव त्यांना अगदी सहज मिळतो, कारण दीपुचि ये हाता! ही नामरूपात्मक लीला आणि तिच्यामागील नाम-रूपातीत लीलामय--मिळूनच ज्ञानेश्वरांचें 'जगत्'! स्वामी विवेकानंद एकदा समुद्रप्रवास करीत होते. वर नभांत पूर्ण चंद्रबिंब हसत होतें, खाली अपरंपार निळा समुद्र उचंबळत होता! त्या सुंदर दृश्याकडे बघत बघत विवेकानंद उद्गारले—If Maya is so beautiful, think of the Reality behind—मायेच्या राज्यांतील दृश्यच जर इतकें सुंदर, तर कल्पना करा--मायेच्या पश्चातीं अवस्थित असणाऱ्या त्या सत्याचें स्वरूप किती सुंदर असेल! ज्ञानेश्वरादिकांचें जगत् आणि या कवींचें जगत् किती निराळें! 'जगा'चें हें चित्र पाहा, आणि तें चित्र पाहा!

आणि ह्या कवींचें 'मन' तरी किती अलग असतें ! जाणीव (conscious), अर्धजाणीव (subconscious) आणि नेणीव (unconscious) या तीनच स्तरांत त्याचा संचार. ह्याच सीमित 'मना'ने हे आपल्या ससीम 'जगा'चा अनुभव घेणार, व तोच आपल्या काव्यांत व्यक्त करणार. आणि ज्ञानेश्वर ? त्यांचें मन ? जाणीव-अर्धजाणीव-नेणीव यांच्या पल्याड असते अतिजाणीव — तुरीय — superconsciousness ! आणि तीच त्यांच्या मनाची सहजावस्था ! म्हणूनच गौडपादांनी मनाच्या दोन अवस्था वर्णिल्या आहेत—मन आणि अ-मन ! जोंपर्यंत मन 'मन' असतें तोंपर्यंतच मी-तूं बोध, तोंपर्यंत सर्पाचीच प्रतीति. पण सम्यक्‌दर्शनाने मन अमन झाल्यावर—'मनसो हि अमनीभावे द्वैतं नैवोपपद्यते' !—मग तूं-मी असा द्विधाविभक्त, खंडित बोध नाही. मग केवळ रज्जूचा बोध, चिद्विलासबोध,—'त्वं स्त्री त्वं पुमान् असि, त्वं कुमार उत वा कुमारी। त्वं जीर्णो दण्डेन वंचसि, त्वं जातो भवसि विश्वतोमुखः'—मग ह्या मनाला अनुभव येऊं लागतो की, तो एकमेवाद्वितीय लीलामय प्रभुच स्त्री, तोच पुरुष, तोच जीवनाच्या उन्मेषाने मुसमुसलेल्या कुमार-कुमारी, तोच आयुष्याच्या ओझ्याने वाकलेल्या वृद्ध नर-नारी, तोच जगभर सर्वकांही ! मग 'प्रतिबोधविदितं मतम्'—बोधीं बोधीं केवळ ब्रह्मबोध, सर्वत्र त्या अरूपाचाच रूप-साक्षात्कार ! ह्या 'अमना'ने आपल्या 'संपूर्ण' जगाचा येणारा अनुभव ज्ञानेश्वर स्वतःच्या विशिष्ट मनोरचनेनुसार व्यक्त करणार.

●

किती वेगळा 'अनुभव' ! आणि, अनुभव घेणारें मन, व ज्याचा अनुभव घेणार तें जग इतकें अलग, इतकें निराळें असल्यावर दोघांचे अनुभवहि वेगळे असल्यास आश्चर्य तें काय ? आणि वेगळेपणा म्हणजे किती ! अगदी प्रकारगत भेद, अक्षरशः जमीन नि अस्मान इतकी

तफावत. एकाचा अनुभव सर्पभ्रांतीचा तर दुसऱ्याचा रज्जु-लीलेचा ! साधारण कवींचा जगाचा अनुभव कितीहि विविध नि विपुल असला, कितीहि प्रचुर नि प्रगाढ असला तरी तो 'अल्प'च—त्यांत 'आणखी पाहिजे'ची भुणभुण कायमचीच, अगदी पिंडगत, अगदी अंगभूतच ! पूर्ण तुष्टि, स्थायी समाधान, अचल आनंद बिचाऱ्यांना माहीतच नसतो. म्हणूनच "आयुष्याच्या ससेहोलपटींतच समाधान" मानायचें ! ह्या हृदयशोषी असमाधानाचेंच एक तत्त्वज्ञान निर्मून त्यांतच समाधान मानायचें !—"शाश्वत सुख आणि समाधान ! हीं कोणाला जगांत लाभलीं असतील का ?... किती धांवा.... तेंच असुख ! तेंच असमाधान !...लाभ आणि पूर्णता ?—छेः ! कधीच नाही. डोंगावरचा फुटका रांजणच तो ! ही असमाधानाची भेग इतकी खोल खोल आहे की कसलीहि भर त्यांत टाका, ती कधी भरून यावयाची नाही". जगाच्या खऱ्या अनुभवाची उपेक्षा केल्यास, जीवनाच्या यथार्थ प्रकाशास मुकल्यास आणखी काय होणार ? सारा जन्म निघून जातो, आयुष्याचें माप बरोबर पदरांत पडत नाही. कसें पडेल ? उगाच का तत्त्वदर्शी ऋषींनी प्रेमाचा गंभीर इशारा देऊन ठेवला आहे की— "बाळांनो, न अल्पे सुखम् अस्ति !" तोच ज्ञानेश्वरादिकांचा 'अनुभव' पाहा. ज्या दिवशीं तो भूमा लाभेल तो 'सोनियाचा दिवस अमृतें' बोळेल. आणि मग 'आनंदी आनंद, अवघा आनंदी आनंद' ! त्या आनंदांत बदल नाही, खळ नाही, खळ, बदल कशाने होणार ? देश आणि काल यांनीच ना ? ते देश काल त्या आनंदाला स्पर्शूहि शकत नाहीत—तो देशकालातीत. म्हणूनच त्यांत पूर्ण तृप्ति, स्थायी समाधान, अचल आनंद. ज्ञानेश्वरादिकांच्या 'अनुभवा'चें स्वरूप हें असें आहे.

याप्रमाणे उभयतांच्या जगाचें, मनाचें व अनुभवाचें स्वरूप आणि त्यांतील पार्थक्य आपण पाहिलें. आपल्या भावनामृदु मनाने येणारा जगाचा अनुभव भावगम्य नि भावरम्य शब्दांत व्यक्त करणारा तो कवि, व त्याची ती वाङ्मयी अभिव्यक्ति म्हणजे काव्य अशी जर कवीची व काव्याची अपारिभाषिक परिभाषा मानली तर काय निष्कर्ष निघेल ? 'आंशिक' जगाचा 'अर्धवट' मनाने घेतलेला 'असंपूर्ण' अनुभव व्यक्त करणाऱ्या एकांगी वाङ्मयनिर्मितीला काव्य व त्याच्या निर्मात्याला कवि म्हणायचें की, 'समस्त' जगाचा 'पुऱ्या' मनाने घेतलेला 'संपूर्ण' अनुभव सुव्यक्त करणाऱ्या सर्वांगीण वाङ्मयनिष्पत्तीला नि तिच्यामागील व्यक्तीला ? खरोखर, या ज्ञानेश्वरांना कवि म्हणायचें नाही तर कवि म्हणायचें कुणाला ? त्यांच्या ललित निर्मितीला नाही तर मग काव्य म्हणायचें तरी कशाला ?

२

केवळ 'रस'-निष्पत्तीच्या दृष्टीनेहि पाहिलें तरी कोण खरोखर कवि ठरेल ? नामरूपात्मक जगतामधील विभाव-अनुभाव-व्यभिचारी-भावादि क्षणभंगुर वस्तूंशीं नि घटनांशीं होणाऱ्या संयोगाने निष्पन्न होणारा, केवळ तेवढ्या वेळेपुरताच मीपणाचा (परिमित प्रमातृभावाचा) नि इतर गोष्टींचा (वेद्यान्तरसंपर्काचा) फक्त विसर पाडणारा, ललनादि विभावांशीं संयोग आहे तोंवरच टिकणारा (विभावादि-जीवितावधिः), आणि ब्रह्मानंद ज्यांनी जन्मांत, नव्हे कल्पनेंतहि कधी चाखला नाही अशांनीच निव्वळ भावनेच्या भरांत ज्याला ब्रह्मास्वादाची उपमा देणें शोभत असते (ब्रह्मास्वादम् 'इव') असा 'शृंगारादि' नऊ-दहा-अकरा वा (प्रक्षोभ आणि क्रांति मिळून !) बारा संख्यक 'रस' पिकवील त्याला आपण रूढार्थाने कवि आणि त्याच्या लिखाणाला काव्य म्हणत असतों. उलट, केवळ करमणुकीखातर नव्हे, तर

जीवनांत यथार्थ आनंदाची प्राप्ति व्हावी म्हणून निष्ठेने ज्ञानेश्वरांच्या ग्रंथांचें अनुशीलन केल्यासहि 'रस' लाभतो अशी शिवकल्याणादिकांची गोड, लडिवाळ, अभिजात नि स्वानुभवसिद्ध प्रामाणिक साक्ष आहे. आपल्या अनुभवामृत-विवरणाच्या भूमिकेंत शिवकल्याणांनी अनुभवामृताला 'रसवल्ली वेल्हाळ' असें म्हटलें आहे. पण हा रस कोणता? हा रस तो—"रसो वै सः, रसं हि एव अयं लब्ध्वा आनंदी भवति, यतो वाचो निवर्तन्ते अप्राप्य मनसा सह!" हें मी-तूं बोधयुक्त मन नि तो द्वैतबोध व्यक्तविणारी वाणी यांच्या सीमासंकुचित कक्षेबाहेर त्या रसाचें अधिष्ठान आहे. ह्या नामरूपमय, नित्यपरिवर्तनशील जगांतील समस्त अनित्य वस्तु आणि घटना ज्या वेळीं ज्ञानोद्भासित होऊन जातात, मीपण आणि इतर गोष्टी यांचा फक्त विसरच न पडतां ज्या वेळीं सम्यक् दर्शनाने त्यांच्या स्व-रूपाची यथार्थ उपलब्धि होते, विषय-विषयी वा भोग्य-भोक्ता ही भावना ज्या वेळीं प्रभुप्रसादाने पूर्ण लयास जाते, सारांश, आंत-बाहेर ज्या वेळीं केवळ तोच लीलामय अनुभवास येऊं लागतो त्याच वेळीं हा 'रस' आविर्भूत होतो! ज्ञाननिर्धूतकल्मष, साधनापूत शतसहस्र प्रत्यक्षदर्शी ब्रह्मज्ञ महापुरुष ह्या ब्रह्मरसाचा आस्वाद घेत त्यांतच रममाण होऊन शाश्वत शांतीचे, चिरसमाधानाचे अधिकारी झालेले आहेत— 'जो अनुभविजे संतीं, सोहंभावें पारंगती रमिजे जेथ!' शिवकल्याण म्हणतात—जेथ समाधि पावे समाधान, ती ही रसवल्ली वेल्हाळ! निर्विकल्प समाधींत, भोग्य-भोक्ताविकल्परहित अमनी मनांतच ही रसवल्ली उगवत असते! ह्याच लोकातीत रसानुभूतीचें ज्ञानेश्वरांनी अ-लौकिक आनंदछंदांतून उद्गान केलेलें आहे—हे ज्ञानेश्वर कवि नाहीत तर मग कवि कोण? त्यांचें अक्षर वाङ्मय काव्य नव्हे तर मग काव्य कोणतें? कविपदवीला पात्र कोण? रसिकंमन्य ज्यांचा

उठल्यासुटल्या उदो उदो करीत असतात ते कविवर की हे ज्ञानेश्वर ? पण ! पण—ज्ञानेश्वरांना कवि म्हटलें की मग उरलेल्यांना काय म्हणायचें ?

●

कारण, हे दोघेहि एकाच अर्थाने कवि कदापि होऊं शकणार नाहीत, तसें करूं जाणें म्हणजे ज्ञानेश्वरांचा अधिक्षेप, अपमान करणें होय, आत्मघात होय. कवि वस्तुतः ज्ञानेश्वरच होत. आचार्य शंकर म्हणतात—कवि म्हणजे क्रांतदर्शी, सर्वज्ञ. भूत-भविष्य-वर्तमानादि कालखंड ज्यांत खंड पाडूं शकत नाहीत अशी अखंड रसानुभूति ज्यांना होत आहे, सम्यक् दर्शनलाभाने ज्यांना विश्वांतील सर्व वस्तूंचें गूढ स्वरूप-रहस्य कळलेलें आहे ते ज्ञानेश्वरच कवि—कवि ज्ञानेश्वर ! 'कविः मनीषी परिभूः स्वयंभूः'—त्याच्याशीं, त्या 'कविं पुराणम् अनुशासितारम्'शीं एक झालेले ज्ञानेश्वरच खरोखर कवि. ऋषींचीच वाणी आहे––ब्रह्मवित् ब्रह्मैव भवति – जानत तुमहि तुमहि व्है जाई ! अशा त्या ज्ञानेश्वरांना "बोलून चालून एक 'कथा' आणि ती सुद्धा अत्यंत रसाळपणें" सांगावयाची असणें कसें बरें संभवतें ? हं, कवि ज्ञानेश्वरांना एक कथा सांगायची होती खरी, पण ती रसकथा नव्हे. त्यांना सांगायची होती तीच पुरातनी ब्रह्मकथा, त्यांना गावयाची होती तीच चिरंतनी तत्त्वगाथा,—मधुस्यंदी भाव-संगीतामधून, इतकेंच.

४

मनाचा भावनेचा पैलू दोघेहि आपापल्या अभिव्यक्तीचें माध्यम म्हणून वापरत असल्यामुळे दोघांच्याहि अभिव्यक्तींत लालित्य आढळतें. आणि याच कारणास्तव दोघेहि वरवर पाहणाऱ्याच्या उथळ, बहिर्मुख दृष्टीला सारखेच भासत असले तरी दोघांत किती प्रभेद आहे !

व्यक्तित्व भिन्न, जग भिन्न, मन भिन्न, अनुभव भिन्न, प्रयोजन भिन्न, कारण भिन्न, हेतु भिन्न, आणि म्हणूनच फलहि भिन्न ! अमळ निरखून-पारखून पाहणाऱ्याला पदोपदीं हा भेद जाणवेल. हेंच बघा ना—कविकुलललामभूत उपमाधिराज कालिदास आपल्या रघुवंशाच्या प्रारंभीं जगाच्या आदि कारणांना वंदन करतात—

"वागर्थौ इव संपृक्तौ वागर्थप्रतिपत्तये ।
जगतः पितरौ वन्दे पार्वतीपरमेश्वरौ ॥"

सम्यक्दर्शनसंपन्न जीवनशिल्पी ज्ञानेश्वरहि आपल्या अनुभवामृताच्या आरंभीं त्याच विश्व-कारणांना वंदन करतात—

'अद्वैतम् आत्मनः तत्त्वं दर्शयन्तौ मिथस्तराम् ।
तौ वन्दे जगताम् आद्यौ तयोः तत्त्वाभिपत्तये ॥

या दोन वंदनांमधील वंदकांच्या बोधांचें पार्थक्य त्यांच्या वंदन-हेतूंवरून किती स्पष्ट दिसतें आहे ! एक वंदन करतो अर्थवाही नादमधुर शब्द सुचावेत म्हणून ! दुसरा वंदन करीत आहे त्या वंद्य शिवशक्तीचें 'तत्त्व' आकळतां यावें म्हणून. कालिदासाची ऐहिकता ( secular consciousness ) नि ज्ञानेश्वरांची अ-लौकिकता ( spiritual consciousness) वंदनेच्या शब्दांशब्दांतून घवघवीतपणें प्रकट होत आहे !

वर्डस्वर्थ म्हणे निसर्गाचे कवि होते—निसर्गाच्या सान्निध्यांत म्हणे बेहोश होऊन जात असत. जीवनांतील सर्वोच्च मूल्यांच्या लाभाविषयी हे भावनाविव्हल निसर्गकवि म्हणतात—

One impulse from the vernal wood
Can teach you more of man
of moral, evil and of Good
Than all the sages can !

सर्वोच्च जीवनमूल्याचा प्रत्यक्ष लाभ झालेले कृतार्थ जीवन-कवि ज्ञानेश्वर बजावतात—

"जयाचा दिठिवा-वसंतु, जव न रिगे निगमवना आंतु
तव आपलीये फळीं हातु, न घेपतीहि !"

वनश्रीच्या सान्निध्यांत वसंताची फक्त एक झुळुक, एक गोड शिरशिरीच निसर्ग-कवीला जीवनाचें रहस्य शिकवूं शकते—सगळे संत-महापुरुष तिच्यापुढे तुच्छ ! उलट आमचे जीवन-कवि म्हणतात, सगळ्या कशाला, फक्त एकाच महापुरुषाचा जरी तुम्हांला आश्रय लाभला तरी पुरें. त्याच्या दयादृष्टीचा वसंत तुमच्या शास्त्राध्ययनवनांत शिरतांच शास्त्रांचा अर्थ जें सम्यक्-दर्शन, तें तुम्हांला लाभेल. मात्र असा महापुरुषसंश्रय जर तुम्हांला लाभला नाही तर मात्र सर्व व्यर्थ—मग वेद म्हणजे वन, रस्ता हारवून खुशाल मग त्या किर्र अरण्यांत भटकत फिरा !

निसर्ग-कवीचा अनुभूतिशून्य, फेसाळ भावनांचा हास्यास्पद फसफसाट कुठे नि जीवन-कवींचा अनुभूतिव्यंजक, तेजाळ ज्ञानाचा भावनारम्य आविष्कार कुठे ! जीवनाच्या सिद्धांतविषयी, साध्याविषयी, साधनेविषयी दोघांच्या उद्गारांत किती फरक ! किती विदारक प्रकाश पडतो दोघांच्या अंतरंगांवर या उद्गारांनी ! मुळा खाणाऱ्यांच्या ढेकरांनाहि मुळ्याचा वास मारतो. ऐहिकतेचा मुळा या वर्डस्वर्थ-कालिदासादिकांनी खाल्ला आहे, प्रत्येक उद्गाराला त्याचा वास ! ज्ञानेश्वरांनी खाल्ला आहे—कंद !—आनंदकंद ! बोलतील त्याला त्याचाच सुरभिगंध !

५

हा मुळ्या-कंदांतला फरक अगदी पदोपदीं नडतो बेटा ! हेंच पाहाना—'सत्यं शिवं सुंदरम्' हें या कवि-साहित्यिकांचें अगदी लाडकें

ब्रीदवाक्य, सरस्वतीच्या अर्चना-आराधनेचा त्यांचा आवडता उपासना-मंत्र. कवि-साहित्यिकच का, भावनेमधून आत्माभिव्यक्ति करणारा प्रत्येक कलावंत तुम्हांला हेंच ठासून सांगेल की तो सत्य-शिव-सुंदराची उपासना करीत आहे. वास्तववाद, अस्तित्ववाद, जीवनाचें प्रतिबिंब वगैरे वगैरेंचा आसरा घेऊन ते आपल्या प्रत्येक अभिव्यक्तींत भरगच्च 'सत्य' असल्याबद्दल तुमची खातरजमा करून देतील. आणि सौंदर्या-विषयी तर बोलायलाच नको. ती तर यांची मिरास, मक्ताच! "केवळ सौंदर्याचीं स्फुरणें प्रस्फुरणें दिव्य, जिव्हार हेंच स्वानंदाचें—'सौंदर्यचि' काव्य!" असुंदरांतहि म्हणे यांना सौंदर्य दिसत असतें. मानलें! पण—'शिव'? जीवन-सुमनाचा अति मधुर, अति उदात्त, अति आकर्षक सुगंध, मानव-जीवनाचा सर्वांत मोठा अलंकार जें 'शिव'त्व, जें चारित्र्य, जें शील—त्याचें काय? तें कितपत यांच्या जीवनांत बिंबलेलें असतें? त्या बिंबाचें कसें प्रतिबिंब यांच्या कलाकृतींत पडलेलें आढळतें?

या अत्यंत नाजुक मुद्याची चर्चा करतांना एक गोष्ट अगदी प्रामाणिकपणें सांगून ठेवावीशी वाटते. ती ही की, या बाबीकडे आपल्याला वैयक्तिक दृष्टींतून मुळीच बघावयाचें नाही. शुद्ध मानस-शास्त्रीय विश्लेषण करून जीवन-सिद्ध ज्ञानेश्वर आणि रससिद्ध कवीश्वर यांच्यांतील पार्थक्य नि भिन्नत्व आपल्या विवेचनाच्या ओघांत आपल्याला बघावयाचें आहे.

भावनेच्या पैलूचा प्रकर्ष लक्षांत घेतां इतर सर्व कवि आणि ज्ञानेश्वर या उभयतांच्या मनाची घडण सारखी कशी आहे हें आपण पाहिलेंच. त्यामुळे, इतर सर्व कवींप्रमाणेच ज्ञानेश्वरांचा 'अनुभव' वा 'सम्यक् दर्शन'हि सत्य-शिव-सुंदराच्या कविसुलभ काव्यमय छंदांतूनच प्रकट झालेलें दिसेल. आणि म्हणूनच दोघेहि वरवर सारखे भासतात.

पण केवळ 'वस्तुनिष्ठ' ( objective ) बाह्य दृष्टि सोडून अमळ 'व्यक्तिनिष्ठ' ( subjective ) दृष्टीचा अवलंब केल्यास काय दृष्टोत्पत्तीस येतें ?

साधारण कवींच्या 'मना'चें स्वरूप आपण मागे एकदा पाहिलेंच आहे. मी भोक्ता व जगत् भोग्य ही जाणीव त्या मनाचा स्वभावधर्म होय. आचार्य शंकरांनी यालाच 'अस्मत् प्रत्ययगोचर' विषयी नि 'युष्मत् प्रत्ययगोचर' विषय असें संबोधून, ही उभयविध जाणीव स्वतःच्या व जगाच्या खऱ्या स्वरूपाच्या अज्ञानामुळेच तुमच्या-आमच्या मनांत रुजलेली असते असें सांगितलें आहे. या जाणिवेलाच त्यांनी सर्पभ्रम किंवा अध्यास म्हटलें आहे. जें मन जाणीव, अर्धजाणीव व नेणीव या स्तरांतच आबद्ध असतें तेंच या अध्यासाचें अधिष्ठान होय. हेंच मन आपल्या समस्त शिव आणि अशिव संस्कारांचा आश्रय होय. फ्रॉईड वगैरेंचीं ह्या त्रि-स्तरयुक्त मनासंबंधीचीं मतें जशीच्या तशींच जरी मानलीं नाहीत तरी त्यांवरून या लौकिक ( empirical ) मनाच्या अशिव पैलूची, काळया बाजूची आणि शबल-दुर्बल-पंकिल स्वभावाची यथार्थ कल्पना येते यांत मात्र संशय नाही. तुम्हां आम्हां सर्वांचेंच, आणि म्हणून कवि-साहित्यिकादि कलावंतांचेंहि 'राहणें' ह्या मनांतच असतें. ह्याच मनाने आलेली जगाची त्यांची अनुभूति त्याच मनाच्या माध्यमांतून व्यक्त होत असते. साहजिकच त्या मनाचे गुणदोष त्यांच्या अनुभूतींत आणि तिच्या अभिव्यक्तींत ओतप्रोत अनुस्यूत असणार. कलावंताचें समस्त जीवनच याच मनाशीं निगडित असतें. आणि म्हणूनच शुभाशुभसंमिश्र अशा या अपूर्ण ( imperfect ) मनाची अनुभूति नि तिची अभिव्यक्ति नेहमीच 'शिव' कदापि असूं शकणार नाही, हें मानसशास्त्रीय सत्य होय. कधी अशिव तर कधी शिव असा अंधार-उजेडाचा लपंडाव यांच्या जीवनांत आणि कलाभिव्यक्तींत

अपरिहार्यपणें सतत चाललेला असतो. त्यांतहि परत, मन जितकें भावनाप्रधान, जितकें आवेगी तितका त्यांत हा लपंडाव अधिक प्रखर, अत्यधिक प्रबल असतो. आणि कलावंत म्हणजेच भावनाधीन, भावनावश, भावनाप्रधान माणूस. म्हणूनच कधी खूप भले तर कधी खूप बुरे असेच हिंदोळे त्यांच्या जीवनांत, व त्या जीवनाचें प्रतिबिंब पडलेल्या त्यांच्या कलाकृतींत आढळत असतात. म्हणूनच, सात्त्विक संतापाच्या भरांत कधी कधी 'साहित्यिक' ही शिवी ठरविण्यापर्यंत कित्येकांची रास्त मजल जात असावी ! म्हणूनच, माझें काव्य आणि चरित्र यांपैकी फक्त एक कोणतेंतरी वाचा असें एका मराठी कवीने आपल्या गुणलुब्ध मित्राला लिहिलें असावें ! ज्यांची 'अनुभूति' त्यांच्या स्वतःच्याच व्यक्तित्वावर, चारित्र्यावर, 'शिवा'चा स्थायी ठसा उमटवूं शकत नाही, तीच त्यांच्या कलाकृतींतून व्यक्त झाल्यानंतर वाचकादिकांच्या जीवनांत तरी 'शिव'त्व कसें स्थापूं शकणार, इतरांच्या जीवनांत स्थायी बदल कसा घडवून आणूं शकणार ? तुम्ही पोहऱ्यावर पोहरे उपसून पिऊन प्याल, जें त्यांच्या विहिरींत आहे तेंच ना ? त्या द्रवाने तर त्यांचीच तहान मिटत नाही, तेच कायमचे सुधरत नाहीत—सदा असमाधानी, असंतुष्ट, सदा हिंदोळ्यावर, सदा भल्याबुऱ्याचा लपंडाव !

ज्ञानेश्वरांकडे वळा ! या बाबतींत तर मुळी तुलना करणेंच वेडेपणा ! "शुचित्व गा ऐसें, आंग मन जैसें कापुराचें"—कापराप्रमाणे आंतबाहेर शुभ्र, अमल, धवल ! त्यांच्या मनाचें स्वरूपच मुळी भिन्न—अमनी मन. त्यांत भोक्ता-भोग्याचा अध्यास नाही, अज्ञान नाही, शुभाशुभ संस्कारांची गुलामी नाही. त्या मनाने त्यांना स्वतःचा व जगाचा अनुभव येत आहे—'प्रकाशे ते संवित्ति जगदाकारें' 'अतीत दृङ्मात्र द्रष्टादृश्यमिसें होय'—सर्वत्र त्या लीलामयाचा लीलाविलास.

या त्यांच्या 'अनुभूती'ने त्यांचें स्वतःचें व्यक्तित्व, त्यांचें चारित्र्य कापराप्रमाणे निष्कलंक करून टाकलें आहे. आणि हें त्यांचें 'शिव'त्व इतर कलावंतांप्रमाणे 'बदलतें' नाही—अगदी अचळ, अटळ, अढळ. दिवस आणि रात्र यांचा लपंडाव पृथ्वीवर असतो. पण सूर्यावर ? तिथे रात्र तर नाहीच, पण दिवसाचा 'तात्पुरता' उजेडहि नाही, तिथे सदा प्रकाश,— स्वयंप्रकाश. ज्ञानेश्वरांच्या मनांत वा जीवनांत कधी चांगलें तर कधी वाईट असा भल्याबुऱ्याचा लपंडाव नाही. कारण 'ज्ञानदीपु अंतरीं म्हणौनि शुद्ध'—त्याच्या सम्यक् दृष्टीला अपवित्र, अशिव वस्तु दिसेल तरच त्यांचें पावित्र्य चळणार ना ? पण त्यांना दिसत आहे सर्वत्र तो लीलामय, त्याचाच विलास, त्याचाच महिमा. म्हणून, इतरांतहि मधूनमधून 'शिव'त्व दिसत असलें तरी तें सापेक्ष असतें, तो फक्त 'दिवसाचा उजेड' होय. त्यामागे रात्र आहेच. मृगजळ 'पेय' आहे, पण तें पिणें 'चांगलें' नाही म्हणून चूप बसणें ही सापेक्ष, नैतिक नीतिमत्ता ( ethical morality ),—पिण्याची इच्छा आहे पण पीत नाही. परंतु, मृगजळ मुळी पेयच नाही, तो मरुभूमीचा लीलाविलास आहे हें जाणून उपरम पावणें ही निरपेक्ष, आध्यात्मिक नीतिमत्ता ( spiritual morality ) होय. हें 'कांतहीनेने कुकंमसेंदूर' करणें नव्हे! ज्ञानेश्वरांच्या 'अनुभूती'चा त्यांच्या स्वतःच्या व्यक्तित्वावर, चारित्र्यावर, जीवनावर हा असा परिणाम होतो—ते भल्या-बुऱ्याच्या लपंडावापासून, जीवनाच्या हिंदोळण्यापासून चिरमुक्त होतात— "सोऽध्वनः पारमाप्नोति तद्विष्णोः परमं पदम्"—जीवनाची लांबच लांब चढण-उतरण संपून ते त्या परंधामाप्रत पोहोचतात की "यत् गत्वा न निवर्तन्ते"—जिथून कधी परतावें लागत नाही. आणि ह्या कलावंतांचें शिव ? संस्कारांचे बंदे गुलाम ! ह्यांच्या 'अनुभवा'ने— "न तु तत्पदमाप्नोति संसारं चाधिगच्छति"—सतत हिंदोळणें,

भोवळून बेहोश होणें, फिरून हिंदोळणें—जीवनांत चिरंतन शिव नाही, शांति नाही, आनंद नाही—'वाऱ्यावादळांतून झगडणें हेंच जीवित !' ज्ञानेश्वरांच्या 'अनुभूती'चा त्यांच्या स्वतःच्या चारित्र्यावर परिणाम हा असा होतो. आणि "सद्भाव जीवगत, बाहेर दिसती फांकत, स्फटिक गृहींचें डोलत दीप जैसे"--तो जीवगत सद्भाव, तीच अंतरंगांतील शिवमय अनुभूति अमनी मनाच्या निष्कलंक माध्यमांतून भावकोमल छंदांमधून प्रकट होत आहे. कशी ? निष्कलंक स्फटिकगृहांत तेवणाऱ्या दीपाची प्रभा जशी बाहेर फांकते तशी ! ज्या अपरोक्षानुभूतीच्या दिव्य प्रभेने ज्ञानेश्वरांचें जीवन उजळून कायमचें शिवमय केलें तीच प्रभा ज्ञानेश्वरी-अमृतानुभवादि किरणांनी बाहेर फांकल्यावर तुमचें-आमचें—कक्षेंत येईल त्याचें जीवन कशी बरें उजळणार नाही ? फक्त कक्षेंत या, नि गंमत पाहा !

सम्यक्‌दर्शनाकारणें ज्ञानेश्वरांच्या जीवनांत बिंबलेलें 'शिव' हें असें आहे, आणि त्याचेंच प्रतिबिंब त्यांच्या ग्रंथांत पडलेलें आहे. शुचिता त्यांच्या जीवनाचा अलंकार, त्यांना श्वासोच्छ्वासासमान नैसर्गिक ! शकुंतलेच्या कविकुलतिलक मानसपित्याची अनघत्वा-संबंधीची, पावित्र्यासंबंधीची स्वैरातिस्वैर 'कल्पना' प्रत्यक्ष मूर्तिमती झाली आहे ज्ञानेशांच्या 'जीवनां'त. आहा, केवढी शुचिता, केवढें अकलंक जीवन !—अनाघ्रात पुष्पच, जणु अलून किसलय, अनाविद्ध रत्न, अनास्वादित मधु, अभुक्त अखंड पुण्य ! ज्ञानेश्वर पवित्र नव्हते —ते पवित्र्य बनून गेले होते ! आणि इतर रसेश्वर कविजन ?— 'शान्तमथवा किमतः परेण'.

●

असो, केवळ 'शिव'च नव्हे. ज्ञानेश्वरांचें नि इतर कवि-साहित्यिकांचें सत्य नि सुंदरहि याचप्रमाणे भिन्न 'प्रकार'चें होय.

नुक्रम ७५६३९ दि: १९/५/२८

2909 2013/01

ज्ञानेश्वरांचें सत्य हें निरपेक्ष, अतींद्रिय सत्य--रज्जूचें सत्य. साहित्यिकांचें सत्य सापेक्ष, इंद्रियगम्य, सर्पाचें सत्य—ज्याला ज्ञानेश्वर 'लटकें' म्हणतात तें ! आणि 'सुंदर' ? असुंदरांतहि सुंदर पाहण्यांत भूषण कवींना—ही तर केवळ सापेक्ष सौंदर्यावरील आसक्ति, मोह ! ज्ञानेश्वरांना असुंदरांत सुंदर दिसत नाही तर, सुंदर-असुंदर दोहोंतहि दिसतो तो एकच लीलामय—आणि म्हणून आसक्ति नाही, मोह नाही, चारित्र्यावर त्यांची गलिच्छ प्रतिक्रियाहि नाही ! सुंदर-असुंदर, नर-नारी असली संकुचित भावनाच नाही—जो कुछ है सो तूंहि है ! म्हणूनच ज्ञानेश्वरांचा उपासनामंत्र 'सत्यं-शिवं-सुंदरम्' नाही, तर—एकात्मप्रत्ययसारं प्रपंचोपशमं 'शांतं-शिवम्-अद्वैतम्' ! मिथ्या मी-तूं प्रपंचाचा पूर्ण उपशम, सर्वत्र त्या एकाच आत्मदेवाचा प्रत्यय, म्हणूनच शांत, शिव ! याच आनंद-मंत्राने विश्वमयाची उपासना—स्वतःच्या उद्धारार्थ नि जगाच्या कल्याणार्थ ! 'सत्यं-शिवं-सुंदरम्' चा फोल, विफल घोष नाही; आहे—आद्य, वेदप्रतिपाद्य, स्वसंवेद्य सर्वात्मरूपाचा सार्थ, सफल जयजयकार !'

६

१६६१८

कवि ज्ञानेश्वर ! किती सार्थ शब्दप्रयोग !—ज्ञानेश्वरांचें विशेषण होऊन कवि शब्द कृतार्थ झाला ! आणि म्हणूनच प्रश्न पडतो, यांना कवि म्हटल्यावर मग इतरांना काय म्हणायचें ! असो तर, हें लोकातीत व्यक्तित्व आणि त्यांचें अलौकिक अक्षर वाङ्मय तुम्हांआम्हांला भगवंताकडून पसायदान म्हणून लाभलें आहे. त्यांच्या चरणचिन्हांचें अनुसरण करून आणि त्यांच्या वाङ्मयाचें निष्ठायुक्त अनुशीलन करून आपण धन्य होऊं या. ज्यांना 'रसां'त बुचकाळ्या मारण्यांतच कृतकृत्यता वाटते त्यांना खुशाल तसें करूं द्या—मृगजळपाणी भरुनि रांजणीं ( तोहि डोंबाघरचा फुटका ! ) या 'रसिकां'ना खुशाल फुंजू-

रूंजूं-गुंजूं, काय हवें तें करूं द्या! आपण शुचिर्भूत होऊन या अमृतकुंभाचें पान करून जीवनशिल्पी ज्ञानेश्वरांचा जीवन-हेतु आणि स्वतःचें जीवन, दोन्ही सार्थ करूं या. त्यांना ब्रह्मविद्येचा सुकाळ करायचा होता, विदग्ध रसाचा नाही!! शिवाजीराजांना भगवतीने अजेय तलवार वरदान म्हणून दिली होती. शत्रूंचा संहार करून स्वराज्य स्थापनेकडे तिचा उपयोग न करतां राजांनी जर आपल्या वडिलांच्या एखाद्या शेतांतील तण उपटून अधिक बाजरी पिकविण्याकडे केला असतां तर आपण त्यांना काय म्हटलें असतें? तोच प्रकार या रसिकांचा! या दैवी दानाचा विनियोग जीवन-शत्रूंचा निःपात करून स्वाराज्य आत्मसात् करण्याकडे न करतां त्याच्या मदतीने हे अधिक रस पिकविणार! असो. त्यांचे-आपले मार्ग भिन्न आहेत. शुभास्तेषां पन्थानः सन्तु—त्यांच्या मार्गावर आपण त्यांना सुयश चिंतूं आणि फक्त एवढीच विनवणी करूं या की, अधिक 'रस-भूमी'साठी जिथे संशोधन करावयाचें तीं तुमचीं वनें-उपवनें तर निराळीं राखीव आहेतच. "शिवा शिवा समर्था स्वामी, येवढीये 'आनंदभूमि', घेपे दीजे एकें आम्हीं, ऐसें केलें"—असें कृतार्थोद्गार काढून जी 'आनंदभूमि' आम्हांला ते जीवनशिल्पी देऊन गेले आहेत तींत तुम्ही आपल्या संशोधनाचा धुडगूस घालूं नका. ज्ञानेश्वरांच्या शीतल कृपाछत्राखाली बसून त्या आमच्या हक्काच्या भूमीवर आम्हांला तत्प्रदत्त ब्रह्मरसस्वादु अनुभवामृत निश्चित पान करूं द्या. आम्हीहि तुम्हांला त्रास द्यायला येणार नाही. लौकिक काव्यरस संतत आकंठ पिऊनहि आयुष्याचा विरस होण्याचें टळत नाही, जीवनाची कटुता जात नाही हें अखेर उमजल्यावर मग आपोआपच तुम्हीहि या लोकातीत रसाची कदर समजूं शकाल. असल-नकलेंतील तारतम्य आकळून नकलेविषयी उबग, विराग उत्पन्न होत नाही तोंवर तुमचा तो रस तुम्हांला लखलाभ

असो. तुमच्या रसभूमींत शिरून तुमच्या रसपानांत व्यत्यय आणायला आम्ही मुळीच उत्सुक नाही. तुमच्या त्या रसांतला वांटाहि आम्हांला नको आहे—"किम् अहं तेन कुर्याम् येन अहं न अमृता स्याम् ?" ज्याने अमृताचा लाभ होऊन 'आणखी'ची तहान मिटत नाही तें घेऊन काय करायचें ! आम्हांला हवें आहे चिरतृप्तिकारी अमृत-रस-काव्य आणि त्याचें प्रसाददान देणारे अमृतस्य पुत्र, जीवनसिद्ध—कवि ज्ञानेश्वर !

---

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १६६१९

## आमचें अन्य प्रकाशन

| | | |
|---|---|---|
| श्रीरामकृष्ण-चरित्र--न. रा. परांजपेकृत-- | | रु. पै. |
| | प्रथम भाग (पांचवी आवृत्ति) | ५.५० |
| | द्वितीय भाग (तिसरी आवृत्ति) | ४.३७ |
| श्रीरामकृष्ण-वचनामृत--श्री. 'म' संकलित | | |
| | प्रथम भाग (दुसरी आवृत्ति) | ५.५० |
| | द्वितीय भाग | ८.०० |
| | तृतीय भाग | ९.०० |
| भगवान श्रीरामकृष्णांच्या लीलासहधर्मिणी श्री सारदादेवी | | ६.२५ |
| स्वामी विवेकानंद यांचें चरित्र (नवीन तिसरी आवृत्ति) | | ८.२५ |
| भगवान श्रीरामकृष्णाचे एक प्रमुख शिष्य | | |
| | स्वामी शिवानंद ('महापुरुषजी') | २.७५ |
| भगवान श्रीरामकृष्णांचे एक प्रमुख शिष्य स्वामी सारदानंद | | ४.५० |
| भगवान श्रीरामकृष्णांच्या दोन अंतरंगशिष्या | | |
| | अघोरमणि व 'गौरी मा' | २.०० |
| साधु-नागमहाशय चरित्र—(दुसरी आवृत्ति) ... | | २.०० |
| हिमालयाच्या कुशींत—स्वामी अखंडानंद ... | | २.५० |
| श्रीरामकृष्ण-वाक्सुधा--(पांचवी आवृत्ति) | | |
| | स्वामी ब्रह्मानंद द्वारा संकलित | १.०० |
| स्वामी विवेकानंदांच्या आठवणी--(दुसरी आवृत्ति) | | १.७५ |
| कठ उपनिषदाचें अंतरंग–स्वामी शिवतत्वानंद | | २.२० |
| स्वप्न-योग अथवा स्वप्नांचा अर्थ—स्वामी शिवतत्वानंद | | १.३० |

## स्वामी विवेकानंदकृत पुस्तकें

| | | | |
|---|---|---|---|
| ज्ञानयोग (दुसरी आवृत्ति) ... | | | ४.७५ |
| राजयोग (पतंजलींचीं योगसूत्रें आणि त्यांचें सुबोध विवरण यांसह) – (दुसरी आवृत्ति) | | | ३.४० |
| कर्मयोग (तिसरी आवृत्ति) ... | | | २.१० |
| भक्तियोग (दुसरी आवृत्ति) ... | | | १.७५ |
| प्रेमयोग | १.७५ | वेदान्त आणि जीवन | १.२५ |
| सुबोध राजयोग | ०.६० | पूर्व आणि पश्चिम | १.२५ |
| हिंदुधर्म | १.२० | आधुनिक भारत | ०.९० |
| विविध | २.०० | ज्ञानमार्गावरील प्रवचनें | ०.९० |
| कविता | १.५० | उच्च जीवनाची साधना | १.५० |
| कोलंबो ते अल्मोरा (भारतांत दिलेलीं व्याख्यानें) | | | ६.२५ |

| | | |
|---|---|---|
| स्वामी विवेकानंदांच्या सहवासांत | ... | ४.५० |
| स्वामी विवेकानंदांचीं पत्रें | ... | ४.७५ |
| दैवी वाणी (उच्च आध्यात्मिक उपदेश) | ... | २.७५ |
| आत्मसाक्षात्कार : साधना व सिद्धि | ... | २.२५ |
| बुद्धदेवांचा जगाला संदेश आणि इतर व्याख्यानें | | २.२५ |
| युरोपच्या प्रवासाची दैनंदिनी | | २.१० |
| धर्माचें विज्ञान आणि तत्त्वज्ञान | ... | २.०० |
| धर्माचें स्वरूप आणि साधन | ... | २.०० |
| स्वामी विवेकानंद यांच्या मुलाखती व प्रश्नोत्तरें | | २.०० |
| भारतीय नारी (दुसरी आवृत्ति) | ... | २.०० |
| धर्मभूमि भारत आणि इतर लिखाण | ... | २.०० |
| वेदान्ताचें स्वरूप आणि प्रभाव | ... | १.७५ |
| महापुरुषांच्या जीवनकथा (सातवी आवृत्ति) | ... | १.६२ |
| भगवान श्रीकृष्ण आणि भगवद्गीता | ... | १.६० |
| स्वामी विवेकानंदांशीं संवाद आणि संभाषणें | ... | १.६० |
| हिंदुधर्म आणि श्रीरामकृष्ण व इतर लेख | ... | १.६० |
| भारताची आध्यात्मिक विचारधारा | ... | १.५० |
| सार्वजनीन धर्म : स्वरूप व साधना | ... | १.०० |
| माझे गुरुदेव—(चवथी आवृत्ति) | ... | १.०० |
| शिकागो व्याख्यानें—(पांचवी आवृत्ति) | ... | १.०० |
| शिक्षण-(तिसरी आवृत्ति) | ... | ०.९० |
| पुनर्जन्म आणि आत्म्याचें अमरत्व (दु. आ.) | | ०.५७ |
| हिंदुधर्माचें नव-जागरण—(दुसरी आवृत्ति) | ... | ०.५६ |
| पवहारी बाबा—(दुसरी आवृत्ति) | ... | ०.५० |

## पॉकेटसाईज पुस्तकें

| | |
|---|---|
| विवेकानंद-वाणी (पां. आ.)—स्वामी विवेकानंद | ०.९० |
| माझें जीवन आणि कार्य—स्वामी विवेकानंद | ०.७० |
| माझ्या मोहिमेची योजना—स्वामी विवेकानंद | ०.५० |
| उद्‌गार आणि बोधवचनें—स्वामी विवेकानंद | १.०० |
| स्वामी विवेकानंद म्हणतात—(दुसरी आवृत्ति) | ०.६० |
| रामकृष्ण-संघ—ध्येय व इतिहास—स्वामी तेजसानंद | ०.७५ |

## स्वामी विवेकानंद ग्रंथावली (एकूण १० खंड)

बोर्ड बांधणी – ७० रु., कापडी बांधणी– ९० रु.

श्रीरामकृष्ण आश्रम, धंतोली, नागपूर – १.

७५६३९

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र.
मुंबई, शाखा ठाणे (प.)
REFBK-0016619
REFBK-0016619